सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३१७ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# राज्यात 'लव्ह जिहाद व अवैध धर्मांतर विरोधी' कायदा तात्काळ करण्याच्या मागणीला जोर

## हिंदू जनजागृती समितीसह हिंदुत्वनिष्ठ संघटनांकडून राज्यभर ठिकठिकाणी प्रशासनाला निवेदने



**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २२ फेब्रुवारी :** गेल्या दोन वर्षांपासून संपूर्ण महाराष्ट्रात 'लव्ह जिहाद' आणि 'अवैध धर्मांतर' या गंभीर समस्यांविरोधात कायदा करण्यासाठी हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी जनआक्रोश मोर्चे काढले. त्यावेळी सरकारने या विषयाचे गांभीर्य ओळखून 'लव्ह जिहाद' विरोधात कठोर कायदा करण्याचे आश्र्वासन दिले होते. मात्र आजही दुर्दैवाने या घटना थांबलेल्या नाहीत, उलट त्यांची तीव्रता आणि क्रूरता वाढतच चालली आहे. आता सरकारने दिलेले आश्र्वासन पूर्ण करण्याची वेळ आली आहे. उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड राज्यांप्रमाणे गुन्हेगाराला जन्मठेप शिक्षा देणारा कठोर आणि अजामीनपात्र स्वरूपाचा 'लव्ह जिहाद' व अवैध धर्मांतर विरोधी कायदा' येत्या अधिवेशनात तात्काळ संमत करावा अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने राज्यशासनाकडे केली आहे.

या दृष्टीने समितीने मुख्यमंत्री, गृहमंत्री यांच्याकडे राज्यभरातील विविध जिल्ह्यातील एकूण ७५ हून अधिक ठिकाणी स्थानिक जिल्हा आणि तालुका प्रशासन तसेच स्थानिक लोकप्रतीनिधींमार्फत निवेदने दिली. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, छ. संभाजीनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापुर, बीड, धाराशिव, बुलढाणा, अकोला, यवतमाळ, अमरावती, वाशिम, चंद्रपुर, नागपुर आदी जिल्ह्यांमध्ये मोठ्या संख्येने महिला व हिंदुत्वनिष्ठांनी एकत्रित येत निवेदनाच्या मार्फत वरील मागण्या केल्या आहेत.

राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या (छउठइ) अहवालानुसार महाराष्ट्रातून बेपत्ता असलेल्या १,७८,००० हून अधिक महिला आणि मुलींचा शोध घेण्यासाठी 'विशेष मोहीम' राबवावी आणि त्यातील 'लव्ह जिहाद'ची प्रकरणे वेगळी नोंद करावीत. 'लव्ह जिहाद'चे प्रकार अजूनही सर्रास घडत आहेत. याची गंभीरता पाहता प्रत्येक जिल्ह्यात पोलीस उपअधीक्षक (ऊइझ) दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली 'लव्ह जिहाद विरोधी विशेष पथक' स्थापन करून 'लव्ह जिहाद'च्या प्रकरणांचा निकाल ६ महिन्यांच्या आत लागावा, यासाठी जलदगती न्यायालये स्थापन करावीत. याविषयी विदेशातून येणारा निधी, जिहादी नेटवर्क आणि तस्करीचा सखोल तपास करून मदत करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. तसेच धर्मांतर किंवा आंतरधर्मीय विवाह करण्यापूर्वी किमान ६० दिवस आधी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करणे आणि पोलीस चौकशी होणे बंधनकारक करावे या मागण्याही समितीने दिलेल्या निवेदनात केल्या आहेत.

महाराष्ट्र राज्यही उत्तर प्रदेश, उत्तराखंड, मध्य प्रदेश, गुजरात आणि हिमाचल प्रदेश या राज्यांच्या धर्तीवर लव्ह जिहाद विरोधी कायदे लागू करेल. महाराष्ट्र हे छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य आहे, जिथे परस्त्रीला मातेसमान मानले जाते. या अधिवेशनात ऐतिहासिक निर्णय घेऊन महाराष्ट्राला 'लव्ह जिहाद मुक्त' आणि 'धर्मांतर मुक्त' करावे, हीच आमची अपेक्षा आहे!

# देशाची बदनामी करण्यात काँग्रेस मग्न : पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्लीत पार पडलेल्या 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट'मध्ये युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी शर्ट काढून केलेल्या आंदोलनाचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी (दि. २२) सडेतोड शब्दांमध्ये समाचार घेतला. काँग्रेस आपल्या घाणेरड्या आणि नग्न राजकारणासाठी एका जागतिक कार्यक्रमाचा वापर करत असल्याचा आरोपही पंतप्रधान मोदी यांनी केला.

मेरठ येथील एका जनसभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदींनी काँग्रेसवर बोचरी टीका केली. ते म्हणाले, तुम्ही आधीच वैचारिकदृष्ट्या नागवे आहात, मग तुम्हाला कपडे उतरवण्याची गरजच काय पडली? काँग्रेसच्या नेत्यांनी जे केले ते या देशातील सर्वात जुना पक्ष किती वैचारिकदृष्ट्या दरिद्री झाला आहे, हे दर्शवते. काँग्रेस स्वतःच्याच देशाची बदनामी करण्यात मग्न आहे. देशातील



काही राजकीय पक्षांना भारताचे यश पचनी पडत नाहीये. नुकतीच भारतात जगातील सर्वात मोठी एआय परिषद पार पडली. पण काँग्रेस आणि त्यांच्या इकोसिस्टमने काय केले? एका जागतिक कार्यक्रमाला त्यांनी आपल्या घाणेरड्या राजकारणाचा अड्डा बनवले, असा आरोपही त्यांनी केला.

### एआय समिट हा भाजपचा कार्यक्रम नव्हता

एआय समिट हा भाजपचा कार्यक्रम नसल्याचे स्पष्ट करत पंतप्रधान मोदी म्हणाले, काँग्रेस नेते माझा द्वेष करतात, ते माझी कबर खोदू इच्छितात. अगदी माझ्या आईचा अपमान करायलाही ते मागे–पुढे पाहत नाहीत. त्यांनी हे लक्षात घ्यायला हवे होते की, ही परिषद राष्ट्रीय कार्याचा भाग होती, भाजपचा कार्यक्रम नव्हता. काँग्रेसने त्या दिवशी सर्व मर्यादा ओलांडल्या असून त्यांच्या या भ्रष्ट धोरणाचा संपूर्ण देश निषेध करत आहे.

**काय घडलं होतं?**

शुक्रवारी (दि.२१) युवक काँग्रेसच्या एका गटाने अमेरिकेसोबतच्या व्यापार कराराचा निषेध करण्यासाठी एआय समिटच्या हॉलमध्ये विना शर्ट (अर्धनग्न) प्रवेश केला होता. यावेळी कार्यकर्त्यांनी सरकारविरोधी घोषणाबाजी केली. काहींच्या हातात पंतप्रधान मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे फोटो असलेले टी–शर्ट होते.सुरक्षा रक्षक आणि पोलिसांनी आंदोलकांना रोखण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्यात बाचाबाची झाली. याप्रकरणी पोलिसांनी कृष्णा हरी (राष्ट्रीय सचिव, युवक काँग्रेस), कुंदन यादव (प्रदेश सचिव, बिहार युवक काँग्रेस),अजय कुमार (उपाध्यक्ष, युपी युवक काँग्रेस) आणि नरसिंह यादव (राष्ट्रीय समन्वयक) यांना अटक केली होती. सर्वांना शनिवारी न्यायालयात हजर केले असता, त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# शरद पवारांची प्रकृती पुन्हा बिघडली; रुबी रुग्णालयात दाखल

**तभा वृत्तसेवा**

**पुणे, दि. २२ फेब्रुवारी :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर शरद पवार यांची प्रकृती खालावल्याचे समोर येत आहे. दरम्यान आता पुन्हा एकदा पवार यांची तब्येत काहीशी बिघडली आहे. त्यामुळे शरद पवार यांना पुन्हा एकदा पुण्यातील रुबी हॉल रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. काहीवेळापूर्वीच शरद पवार यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. शरद पवार नुकतेच पाच दिवस रुग्णालयात राहून घरी परतले होते. परंतु, आता पुन्हा त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

प्राथमिक माहितीनुसार, शरद पवार यांना काहीसा अशक्तपणा जाणवत आहे. त्यांच्या शरीरातील पाण्याची पातळी कमी झाल्याने त्यांना अशक्तपणा जाणवत असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे रुबी हॉस्पिटलमध्ये त्यांना सलाईन लावली जाईल, अशी माहिती आहे. अशक्तपणा वगळता शरद पवार यांची प्रकृती पूर्णपणे स्थिर आहे. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर शरद पवार हे अनेक दिवस बारामतीमध्ये होते. त्यांनी सुनेत्रा पवार, पार्थ पवार, जय पवार यांच्या भेटीगाठी घेऊन पवार कुटुंबाला सावरण्याचा प्रयत्न केला होता. यादरम्यान, अचानक त्यांची प्रकृती बिघडली होती. त्यांच्या छातीत कंजेशन झाल्यामुळे पवारांना बारामतीवरुन पुण्याला आणण्यात आले होते. शरद पवार बारामती येथील त्यांच्या गोविंदबाग या निवासस्थानी होते. तेव्हा शरद पवारांना अचानक त्यांना खोकला आणि कफचा त्रास जाणवू लागला, त्यानंतर डॉक्टरांचं एक पथक घरी येऊन तपासणी करून गेले. त्यानंतर त्यांना तातडीने पुण्यातल्या रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर ते पाच दिवस रुबी रुग्णालयात होते. पाच दिवसांच्या उपचारानंतर त्यांची प्रकृती सुधारली होती. त्यामुळे त्यांना घरी सोडण्यात आले होते. तेव्हापासून शरद पवार हे पुण्यातील निवासस्थानी होते. पण, आता त्यांना पुन्हा एकदा अशक्तपणा जाणवू लागल्यामुळे रुग्णालयात दाखल करावे लागले आहे.

# राज्यावर पुन्हा अवकाळीचे मोठे संकट

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २२ फेब्रुवारी :** राज्यासह देशातील हवामानात मोठा बदल होत आहे. थंडी, पाऊस आणि उन्हाळा अशा तिन्ही हंगामाचा अनुभव घेता येतोय. सकाळी थंडी आणि दुपारी कडाक्याचे उन्ह अशी स्थिती आहे. यादरम्यानच राज्यातील काही भागात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला. अवकाळी पाऊस हजेरी लावणार आहे. काही दिवसांपूर्वीच राज्यात मोठा अवकाळी पाऊस झाला, त्याचा परिणाम शेतीवर झाला हाताशी आलेले शेतकऱ्यांचे पीक वाहून गेले. पुढील दोन दिवसात राज्यातील ९ जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस हजेरी लावण्याची शक्यता आहे. उत्तरेकडे अजूनही थंडी गायब आहे. पण राज्यातील थंडी जवळपास गेली. पहाटे थोडासा गारठा जाणवत आहे. फेब्रुवारी महिन्यातही अनेक भागात पाऊस हजेरी लावताना दिसतेय. यादरम्यानच राज्यातील काही शहरातील वायू प्रदूषण हा गंभीर मुद्दा बनला. मुंबईमध्ये वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले असून हवा घातक बनली आहे.

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्यात सध्या पावसाला पोषक वातावरण आहे. उन्हाच्या झळा अधिक तीव्र होत असतानाच राज्यात पाऊस हजेरी लावणार आहे.

## जम्मू काश्मीरमधील किश्तवाडमध्ये

# दोन दहशतवादी ठार

**श्रीनगर :** जम्मू काश्मीरमधील किश्तवाडमध्ये चतरू भागात सुरक्षा पथक आणि दहशतवादी यांच्यात चकमक झाली. सुरक्षा पथकाने दहशतवाद्यांचा तळ उद्ध्वस्त केला तसेच 'जैश – ए – मोहम्मद'च्या दोन दहशतवाद्यांना ठार केले. आणखी काही दहशतवादी परिसरात लपले असल्यामुळे चकमक अद्याप सुरू आहे. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी संघटना 'जैश – ए – मोहम्मद'चे किमान दोन ते तीन दहशतवादी लपले असल्याची माहिती गुप्तचर यंत्रणेने सुरक्षा यंत्रणेला दिली. ही माहिती मिळताच सुरक्षा पथकाने किश्तवाडमध्ये दहशतवाद्यांच्या विरोधात मोहीम हाती घेतली. सुरक्षा पथकाने चतरू भागात शोध मोहीम हाती घेतली. जवान थोड्याच वेळात आपल्यापर्यंत पोहोचणार याची जाणीव होताच दहशतवाद्यांनी सुरक्षा पथकाच्या दिशेने गोळीबार केला. या गोळीबाराला सुरक्षा पथकाने प्रत्युत्तर दिले. चकमकीत 'जैश – ए – मोहम्मद'चे दोन दहशतवादी ठार झाले. सुरक्षा पथकाने चतरूमधील दहशतवाद्यांचा एक तळ उद्ध्वस्त केला.




# विधिमंडळाची दोन्ही सभागृहे देणार अजितदादांच्या आठवणींना उजाळा

## विधिमंडळाची दोन्ही सभागृहे देणार अजितदादांच्या आठवणींना उजाळा

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २२ फेब्रुवारी :** महाराष्ट्र विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवार, २३ फेब्रुवारीपासून सुरू होत असून, पहिल्या दिवशी दोन्ही सभागृहांत राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली जाणार आहे. बारामतीचा तो दुर्दैवी विमान अपघात घडला नसता, तर यंदा राज्याचा अर्थसंकल्प मांडण्यासाठी अजित पवार स्वतः उभे राहिले असते; मात्र नियतीच्या फेऱ्यामुळे आता त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्याची वेळ सभागृहावर आली आहे.

विधिमंडळाच्या पायऱ्यांवरील गोंधळ म्हणजे कामकाज, असा समज रूढ होत असतानाच्या काळात अजित पवार हे संसदीय कामकाजाचे गांभीर्य आणि नियमावलीबाबत अत्यंत आग्रही असत. वैधानिक कामांबाबत असलेली त्यांची आस्था आणि प्रशासनावरील पकड याची उणीव या अधिवेशनात प्रकर्षाने जाणवणार आहे. शोकप्रस्तावावेळी सर्व पक्षांचे गटनेते आपल्या भावना मांडतील, तसेच प्रत्येक पक्षाच्या तीन सदस्यांना बोलण्याची संधी दिली जाईल.



यावेळी सभागृहात उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची उपस्थिती असणार असल्याने हा क्षण अत्यंत भावूक ठरणार आहे.

**वरळीत शोकसभेचे आयोजन**

दरम्यान, सोमवारी सायंकाळी वरळी येथील 'एनएससीआय डोम' येथे भव्य सर्वपक्षीय शोकसभा आयोजित करण्यात आली आहे. राजकीय मतभेद बाजूला सारून राज्यातील आणि देशातील दिग्गज नेते एकाच मंचावर येऊन अजित दादांना अभिवादन करतील. या शोकसभेला सत्ताधारी आणि विरोधक अशा दोन्ही बाजूंचे नेते उपस्थित राहणार आहेत. यात प्रामुख्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्यमंत्री रामदास आठवले, माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्यासह विरोधी पक्षातील प्रमुख नेत्यांचा समावेश असणार आहे.

## विरोधकांचा मुख्यमंत्री फडणवीसांच्या चहापानाला विरोध, सत्ताधारी पक्षावर टीका

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २२ फेब्रुवारी :** महाराष्ट्र राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून सुरू होत आहे. या पार्श्र्वभूमीवर महाविकास आघाडीच्या विरोधी पक्षाच्या नेत्यांनी एकत्र येऊन माध्यमांशी संवाद साधला. या पत्रकार परिषदेत माजी मंत्री विजय वडेट्टीवार, उबाठा गटाचे खासदार आदित्य ठाकरे, काँग्रेसचे वरिष्ठ नेते बंटी पाटील, उबाठा गटाचे माजी मंत्री अनिल परब, काँग्रेस नेते अमीन पटेल आणि उबाठा गटाचे आमदार भास्कर जाधव हे उपस्थित आहेत. पत्रकार परिषदेत बोलताना भास्कर जाधव म्हणाले की, सर्वांना वैयक्तिक निमंत्रण स्वरूपात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून चहापानासाठी पत्र आलं आहे. मात्र आम्ही त्यांच्या चहापानाला जाणार नाही, असे ठाम वक्तव्य त्यांनी केले. त्यांनी स्पष्ट केले की, ही नेहमीची प्रथा आहे, असं जरी वाटत असेल तरी तसं काहीच नाही. भास्कर जाधव यांनी सत्ताधारी पक्षाच्या वर्तनावरही टीका केली. त्यांनी म्हटले की, मुळात सत्ताधारी पक्षाने सभ्यतेच्या चौकटीत राहून लोकशाहीचा सन्मान करणे आवश्यक आहे, परंतु प्रचंड बहुमत मिळाल्यामुळे सत्ताधारी पक्ष आता मस्तीमध्ये आहे. यावेळी विरोधी पक्षाने सत्ताधारी पक्षावर जोरदार हल्लाबोल केला आहे.

## थोडक्यात...

### ब्रिटानिया जिम जॅमने मार्व्हल प्रेरित रोमांचक अशी विशेष श्रेणी सादर केली

**मुंबई :** अभेद्य ढाल, बलवान हातोडे, तीक्ष्ण नखे तसेच क्षणार्धात होणारे जलद पुनरागमन यांमुळे मार्व्हल एंटरटेनमेंटचे सुपरहिरो नेहमीच ॲक्शनच्या केंद्रस्थानी राहिले आहेत.या ऊर्जावान विश्र्वाची अनुभूती हाताशी आणत, ब्रिटानिया इंडस्ट्रीज लिमिटेडच्या जिम जॅम ब्रँडने मार्व्हल-थीमवर आधारित विशेष आवृत्तीच्या पॅकची घोषणा केली असून, या पॅकमध्ये भव्य कथनाक तसेच प्रभावी पात्रांपासून प्रेरित रचना करण्यात आली आहे.ब्रिटानिया जिम जॅम तसेच ब्रिटानिया जिम जॅम पॉप्समध्ये सादर करण्यात आलेल्या नव्या रेंजमध्ये चाहत्यांचे आवडते सुपरहिरो कॅप्टन अमेरिका, थॉर, आयर्न मॅन, डेडपूल तसेच वूल्व्हरिन यांचा समावेश आहे.प्रत्येक पॅकवर वापरण्यात आलेली आकर्षक ग्राफिक्स आणि लक्ष-वेधी दृश्यरचना यांमुळे ही उत्पादने मार्वल चाहत्यांचे लक्ष वेधून घेत आहेत. कॅप्टन अमेरिकेची बलाढ्य ढाल, थॉरचा प्रचंड हातोडा, आयर्न मॅनचा सूट, डेडपूलच्या दोन कटाना तसेच वूल्व्हरिनचे पंजे अशा प्रतीकात्मक घटकांचा समावेश करून स्नॅकिंगच्या अनुभवाला नव्या स्वरूपात सादर करण्यात आले आहे.

### दुसऱ्या संधीचं महत्त्व माझ्यासाठी खूप वैयक्तिक आहे : इक़बाल खान

**मुंबई :** सोनी सब घेऊन येत आहे आपला नवा शो 'यादें', जो जगभरात लोकप्रिय ठरलेल्या इटालियन मालिके डीओसी – नेल्ले तुए मानी चं भारतीय रूपांतर आहे. अनेक देशांमध्ये यशस्वी ठरलेल्या या मालिकेची कथा आयुष्य, प्रेम आणि ओळख यामधील दुसऱ्या संधीभोवती फिरते. या शोमध्ये दाखवण्यात आलं आहे डॉ. देव (इक़बाल खान) यांचा अद्भुत प्रवास, ज्यांनी एका अपघातानंतर आठ वर्षांच्या आठवणी गमावल्या आणि पुन्हा नव्याने आपली दुनिया उभी केली. इक़बाल खानसाठी दुसऱ्या संधीचं महत्त्व खूपच वैयक्तिक आहे. या विषयावर बोलताना त्यांनी आपल्या एका जवळच्या मैत्रिणीची गोष्ट सांगितली, जिचं आयुष्य पूर्णपणे बदललं जेव्हा तिला दुसरी संधी मिळाली. इक़बालला सर्वात जास्त भावलं ते तिच्या आयुष्यातील तो टर्निंग पॉइंट नव्हता, तर त्यानंतर सुरू झालेला प्रवास होता. त्यांची मैत्रीण जुन्या आयुष्यात परतण्याचा प्रयत्न न करता नव्या पद्धतीने पुढे जाण्याचा निर्णय घेतला.

### एमजीएममध्ये दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या डॉ.जी.वाय.पाथ्रीकर संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या वतीने 'डव्हान्स्ड अॅनालिटिक्स अँड पॉवर बीआय फॉर इंटेलिजेंट इन्साइट्स' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा सोमवार दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ व मंगळवार दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायं. ५.०० या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेमध्ये प्रगत विश्र्लेषण तसेच पॉवर बीआय या आधुनिक डेटा विश्र्लेषण साधनांचा अभ्यास करून विद्यार्थ्यांना डेटा आधारित निर्णय प्रक्रिया, उद्योगाभिमुख कौशल्य विकसित करणे आदिबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी आणि अभ्यासकांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्राप्ती देशमुख यांनी केले आहे.

०००००००००००००००००००००००००००००००००



सोयगाव – शहरात सोयगाव व्यापारी महासंघाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करताना मंगेश सोहनी,संजय कासार,रमेश वामने पाटील आदींसह उपस्थित होते. **( छायाचित्र – मंगेश सोहनी,सोयगाव)**

०००००००००००००००००००००००००००००००००

### नागरिकाभिमुख महसूल प्रशासनासाठी समन्वय व क्षेत्रीय दौरे वाढवा : खारगे

**छत्रपती संभाजीनगर :** नागरिकांना शासनाच्या सेवा अधिक वेगाने, पारदर्शक आणि लोकाभिमुख पद्धतीने मिळाव्यात यासाठी जिल्हा स्तरावरील समन्वय वाढविणे, क्षेत्रीय दौरे वाढविणे आणि नागरिकांशी थेट संवाद साधणे अत्यावश्यक असल्याचे निर्देश महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी दिले. छत्रपती संभाजीनगर विभागातील महसूल प्रशासनाचे कामकाज, विकास प्रकल्पांची अंमलबजावणी, विविध शासकीय योजनांची प्रगती तसेच नागरिकाभिमुख सेवांची स्थिती यांचा सविस्तर आढावा त्यांनी विभागीय स्तरावर घेतला. ही बैठक छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयात पार पडली. बैठकीस विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, अप्पर आयुक्त (महसूल) रिता मेत्रेवार, अप्पर आयुक्त विकास (आस्थापना) दादासाहेब वानखेडे, अप्पर विभागीय आयुक्त प्रताप काळे, अप्पर आयुक्त (सामान्य प्रशासन) मंजुषा मिसकर, अप्पर आयुक्त खुशालसिंह आर. परदेशी, सह-आयुक्त रोजगार हमी योजना डॉ. अनंत गव्हाणे, सह आयुक्त (नगर परिषद प्रशासन) देविदास टेकाळे यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# लासूर स्टेशन येथे साडेसहा कोटींच्या अद्ययावत प्राथमिक आरोग्य केंद्राचे लोकार्पण

## आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**

**लासूर स्टेशन, दि. २२ फेब्रुवारी :** ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आणि तात्काळ आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने सुमारे साडेसहा कोटी रुपये खर्च करून लासूर स्टेशन येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची अत्याधुनिक व सुसज्ज इमारत उभारण्यात आली आहे. या नव्या इमारतीचे लोकार्पण शनिवारी (दि. २१) उत्साहात संपन्न झाले.

या प्रसंगी आमदार प्रशांत बंब यांनी आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना संबोधित करताना सांगितले की, ही इमारत केवळ बांधकाम नसून ग्रामीण जनतेच्या आरोग्य सुरक्षिततेची हमी आहे. येथे येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला तत्पर, संवेदनशील आणि चोवीस तास सेवा मिळाली पाहिजे. वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांनी मुख्यालयी राहून जबाबदारीने सेवा द्यावी, हीच अपेक्षा आहे.

नवीन इमारतीमध्ये प्रशस्त ओपीडी कक्ष, प्रसूती कक्ष, लसीकरण विभाग, औषध वितरण कक्ष, प्रयोगशाळा, निरीक्षण कक्ष तसेच डॉक्टर व कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रतीक्षालय आणि रुग्णांसाठी आरामदायी सुविधा याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना उपचारासाठी शहरात जाण्याची गरज कमी होणार आहे.

या लोकार्पण सोहळ्यास अभयानंदगिरीजी महाराज, सभापती शेषराव जाधव, जिल्हा परिषद सदस्या संगीता आमराव, पंचायत समिती सदस्या कविता चव्हाण, पंचायत समिती सदस्य सुनील पाखरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. रंगनाथ तुपे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमोल जाधव, भाजप तालुकाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार बंब यांचे स्वीय सहाय्यक रज्जाक पठाण, गोपाल वर्मा, माजी सरपंच मीना संजय पांडव, गणेश व्यवहारे, संदीप आमराव, प्यारेलाल शहा, नारायण वाकळे, बाजार समिती संचालक मनीष पोळ, दादासाहेब तायडे, भाऊसाहेब चिंधे यांच्यासह वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, आशा सेविका, माजी ग्रामपंचायत सदस्य, बाजार समिती पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ग्रामीण आरोग्य सेवेला बळ**

या नवीन इमारतीमुळे लासूर स्टेशन व परिसरातील गावांना अधिक सक्षम आरोग्य सुविधा मिळणार असून आपत्कालीन सेवा, माता-बाल संगोपन, लसीकरण आणि नियमित तपासणी यांसाठी हे केंद्र अधिक प्रभावीपणे कार्य करणार आहे. ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेला या उपक्रमामुळे मोठे बळ मिळणार असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे आयोजन स्थानिक आरोग्य विभाग व ग्रामस्थांच्या सहकार्याने करण्यात आले.

# सिल्लोडच्या नाटवीतील महिलांची सेंद्रिय क्रांती

## गांडूळ खत निर्मितीतून सिद्ध केले आर्थिक स्वावलंबन



**तभा वृत्तसेवा**

**सिल्लोड, दि. २२ फेब्रुवारी :** महिलांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन आजही 'अबला' असा असला, तरी प्रत्यक्षात महिलांमध्ये सर्वच क्षेत्रांत आर्थिक सक्षमीकरण करण्याची मोठी क्षमता आहे. हेच सिल्लोड तालुक्यातील नाटवी येथील महिलांनी सिद्ध करून दाखवले आहे. 'चूल आणि मूल' या मर्यादेबाहेर पडत, येथील महिलांनी गांडूळ सेंद्रिय खत निर्मिती प्रकल्पाच्या माध्यमातून स्वावलंबनाकडे यशस्वी घोडदौड सुरू केली आहे.

राज्याच्या कृषी विभागाच्या संकल्पनेतून ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी 'महिला शेतकरी गट' स्थापन करण्यात आले आहेत. याच संकल्पनेला मूर्त रूप देण्यासाठी नाटवी येथील 'स्वयम् शिक्षण प्रयोग' संस्थेच्या सदस्यांनी पुढाकार घेतला. संस्थेच्या मार्गदर्शनाखाली गावात ठिकठिकाणी गांडूळ खत निर्मिती प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहेत. पुरुषांच्या तुलनेत आपण कुठेही मागे नाही, हे या महिलांनी आपल्या कतृत्वातून दाखवून दिले आहे. या प्रकल्पाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षिका तथा सखी कोमल दत्ता काकडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या नेतृत्वाखाली गावातील ५० महिलांनी आजवर शेतीपूरक विविध प्रयोग यशस्वीपणे राबवले आहेत. प्रकल्पाची शास्त्रोक्त आखणी करण्यासाठी 'डड्झ'चे प्रकल्प व्यवस्थापक सम्राट कसबे, तालुका समन्वयक अर्चना कोळी, वैशाली घुगे, पुष्पा तुपे आणि शुभम कुमावत या अधिकाऱ्यांचे तांत्रिक मार्गदर्शन लाभले. संसाराचा गाडा ओढतानाच आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी या महिलांनी घेतलेली मेहनत वाखण्याजोगी आहे.

गांडूळ खत निर्मितीची ही मोहीम यशस्वी करण्यासाठी सुरक्षा कालभिले व इतर महिला यांनी अथक परिश्रम घेतले आहेत. केवळ घरगुती जबाबदाऱ्या न सांभाळता, शेतीला जोडधंदा म्हणून सेंद्रिय खत निर्मितीचा आदर्श या महिलांनी संपूर्ण तालुक्यासमोर ठेवला आहे. त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# महसूल विभागाच्या कारवाईत अवैध वाळू साठा व हायवा जप्त



**तभा वृत्तसेवा**

**गंगापूर, दि. २२ फेब्रुवारी :** गंगापूर तालुक्यातील आगर कानडगाव व नेवरगाव शिवारात नदीकाठी रेती साठ्यावर महसूल विभागाची कारवाई गंगापूर तालुक्यातील मौजे आगर कानडगाव व नेवरगाव शिवारात नदीकाठी अवैध रेती साठ्यावर महसूल विभागामार्फत कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान रेतीचा साठा व छोटा हायवा जप्त करण्यात आला.

सदरील कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी डॉक्टर निलेश पालवे पोलीस निरीक्षक कुमार सिंह मंडळ अधिकारी गवळी आप्पा यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राम महसूल अधिकारी ठेंगडे आप्पा, ग्राम महसूल अधिकारी पांचाळ आप्पा तसेच संबंधित गावचे महसूल अधिकारी यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी पोलीस पाटील तसेच पोलीस बंदोबस्तही उपस्थित होता. जप्त करण्यात आलेला रेती साठा व छोटा हवा पोलीस पाटील यांच्या ताब्यात देण्यात आला असून नदीपात्रातील अवैध उत्खननास आळा घालण्यासाठी महसूल प्रशासनाकडून पुढील काळातही अशा प्रकारच्या कारवाया सातत्याने करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# बिडकीन येथे 'मेरा युवा भारत' अंतर्गत पैठण तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. २२ फेब्रुवारी :** भारत सरकारची स्वायत्त संस्था मेरा युवा भारत,छत्रपती संभाजीनगर, आणि टुगेदर फॉर विकास फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पैठण तालुका स्तरीय खुली क्रीडा स्पर्धा' आज बिडकीन येथील संघर्ष फिजिकल अकॅडमीच्या मैदानावर मोठ्या उत्साहात पार पडली. सदर कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा युवा अधिकारी मेघा सनवाल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन शिवसेवा बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा शुभांगी अधाने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की, शासकीय स्तरावर युवकांसाठी राबवल्या जाणाऱ्या 'मेरा युवा भारत' सारख्या उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील टॅलेंटला योग्य दिशा मिळत आहे.याप्रसंगी मार्गदर्शक रवी जाधव यांनी खेळाडूंना तांत्रिक मार्गदर्शन करत शारीरिक सुदृढतेचे महत्त्व पटवून दिले. 'टुगेदर फॉर विकास फाउंडेशन'चे संचालक पंकज धुळे यांनी प्रास्ताविकातून या उपक्रमाची भूमिका स्पष्ट केली. जिल्हा युवा अधिकारी मेघा सनवाल यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या स्पर्धेमुळे तालुक्यातील युवक-युवतींना आपली क्रीडा कौशल्ये दाखवण्याची मोठी संधी प्राप्त झाली. स्पर्धेचे स्वरूप:या क्रीडा स्पर्धेत युवक गटासाठी शंभर मीटर धावणे, रस्सीखेच आणि कबड्डी या खेळांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच युवती गटात शंभर मीटर धावणे, गोळाफेक आणि रस्सीखेच या स्पर्धांमध्ये खेळाडूंनी चुरशीचे प्रदर्शन केले. अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडलेल्या या स्पर्धेचे कौतुक सर्वस्तरातून होत आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संघर्ष अकॅडमीचे स्वयंसेवक, टुगेदर फॉर विकास फाउंडेशनचे पदाधिकारी आणि परिसरातील क्रीडाप्रेमींनी विशेष परिश्रम घेतले. पंकज धुळे यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# निरंकारी मिशनचा भव्य गोदावरी स्वच्छता अभियान संपन्न



**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. २२ फेब्रुवारी :** जगात नावाजलेल्या संत निरंकारी मिशन आयोजित भव्य गंगा स्वच्छता अभियानात ५०० स्वयंसेवीच्या उपस्थितीत दक्षिण काशी गोदावरी मोक्ष घाट,कृष्ण कमल तीर्थासह वाळवंट परिसरातून जवळपास ५ टन कचरा उचलण्यात आल्याची माहिती मिशनच्या पैठण युनिट तर्फे देण्यात आली आहे.

जेव्हा सेवा ही साधना बनते आणि निसर्गाप्रती संवेदनशीलता हा जीवनाचा मूळ मंत्र होतो, तेव्हा पवित्र संकल्पांचा जन्म होतो. मानवी सेवा आणि लोककल्याणाची हीच दिव्य चेतना साकार करण्यासाठी, संत निरंकारी मिशनद्वारे 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' अभियानाच्या चौथ्या टप्प्याचा भव्य शुभारंभ रविवार, दि २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ०९ ते दुपारी १२ : ०० या वेळेत परम श्रद्धेय सद्गुरू माता सुदीक्षा जी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण भारतात भव्य स्वरूपात आयोजित केला गेला.

संत निरंकारी मंडळाचे सचिव आदरणीय श्री. जोगिंदर सुखीजा यांनी माहिती देताना सांगितले की, हे विशाल अभियान देशभरात १५०० हून अधिक ठिकाणी एकाच वेळी राबविण्यात येईल. या व्यापक विस्तारामुळे हा प्रयत्न ऐतिहासिक ठरेल, जिथे 'स्वच्छ जल' मुळे 'स्वच्छ मन' आणि 'स्वच्छ समाजा'ची निर्मिती शक्य होईल.

नद्या, तलाव, सरोवरे, विहिरी आणि झरे यांसारख्या नैसर्गिक जलस्त्रोतांच्या संवर्धन आणि संरक्षणासाठी समर्पित या लोकचळवळीने आपल्या पहिल्या तीन टप्प्यांत सेवा, समर्पण आणि सहभागाचे अद्भुत उदाहरण मांडले आहे. पैठणला भव्य गंगा गोदावरी स्वच्छता अभियान कार्यक्रमासाठी भूषण कश्रवसानकर नगरसेवक बजरंग लिंबोरे, छत्रपती संभाजीनगरचे क्षेत्रीय संचालक विजयजी घोडके वाळूज शाखेचे मुखी शिवाजी कुबड्डेची, मुखी बंडू एखंडेजी जामखेडची मुखी मनोज दादा पालकर पैठणचे मुखी पुंजारामजी कोरडे बद्रीनाथ घाटे शिक्षक महात्मा अविनाश केथा यांच्यासह छत्रपती संभाजीनगर, पाचोड,जामखेड, वाळुज,बजाज नगर येथील सेवादल महात्मा मोठ्या संख्येने उपस्थित राहून मोक्षघाट व गोदावरी पात्रातील घाण कचरा मोठ्या उत्स्फूर्तपणे साफ करून गोदामाचे पात्र अती स्वच्छ आणि सुंदर असं बनवलेले आहे. संत सेवालाल मठात स्वयंसेवीसाठी लंगर व्यवस्था करण्यात आली होती.

# रुग्णांप्रती संवेदनशीलता जपत कार्यरत रहा : अपर जिल्हाधिकारी अंजली धानोरकर

## एमजीएम इन्स्टिटयूट ऑफ फिजिओथेरपीचा पदवी वितरण समारंभ संपन्न



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २२ फेब्रुवारी :** रुग्णांची मानसिकता समजून घेऊन त्यांच्यात विश्र्वास निर्माण करणे आणि त्यांचे मनोधैर्य उंचावणे ही डॉक्टरांची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे. रुग्णांना केवळ वैद्यकीय उपचार देणे पुरेसे नसून समुपदेशकाच्या भूमिकेतूनही आपण कार्यरत असता. डॉक्टर म्हणून आपली सेवा बजावत असताना रुग्णांप्रती दयाळूपणा आणि संवेदनशीलता जपत कार्यरत राहणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी अंजली धानोरकर यांनी यावेळी केले.

एमजीएम इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपीचा पाचवा पदवी वितरण समारंभ मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आज विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात संपन्न झाला. यावेळी, अपर जिल्हाधिकारी श्रीमती धानोरकर यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

या पदवी वितरण सोहळ्यास महात्मा गांधी मिशनचे सचिव अंकुशराव कदम, एमजीएम वैद्यकीय रुग्णालय आणि महाविद्यालयाचे उपअधिष्ठाता डॉ.प्रविण सूर्यवंशी, वैद्यकीय अधीक्षिका डॉ.अपर्णा कक्कड, वैद्यकीय अधीक्षक डॉ.एच.आर. राघवन, प्रकल्प संचालिका डॉ.प्रेरणा दळवी, मुख्य वित्त अधिकारी भारत पेंटावार, प्राचार्य डॉ.सरथ बाबू, परीक्षा विभागाचे प्रमुख डॉ.वैभव कापरे, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

पुढे बोलताना अपर जिल्हाधिकारी अंजली धानोरकर म्हणाल्या की, आपणास आज मिळालेली पदवी हे केवळ आपले वैयक्तिक यश नसून समाजासाठीही अभिमानाची बाब आहे. आपल्या हातातील ज्ञान, कौशल्य आणि प्रशिक्षणाचा समाजहितासाठी प्रामाणिक वापर कराल असा विश्र्वास मला आहे. रुग्णांशी संवाद साधताना त्यांच्या वेदना, भावना आणि अपेक्षा समजून घेणे महत्त्वाचे असून आपण केवळ उपचार करत नाही तर रुग्णांचे आयुष्य सुधारत असता.

उपअधिष्ठाता डॉ.प्रविण सूर्यवंशी यावेळी बोलताना म्हणाले की, आजच्या या महत्त्वपूर्ण समारंभाचा भाग होताना मला अत्यंत आनंद होत आहे. समाजसेवेची शपथ घेऊन वैद्यकीय क्षेत्रात पदार्पण करीत असताना आपण आपल्या ज्ञानाचा उपयोग केवळ व्यवसायासाठी नव्हे तर समाजाच्या आरोग्य उन्नतीसाठी करणे आवश्यक आहे. आधुनिक वैद्यकीय व्यवस्थेत फिजिओथेरपी हा अत्यंत महत्त्वाचा आणि परिणामकारक स्तंभ असून रुग्णांच्या पुनर्वसनात याची भूमिका अनन्यसाधारण आहे. या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी सतत शिकत राहणे, जिज्ञासू वृत्ती जपणे आणि स्वतःला अधिक सक्षम व अद्ययावत ठेवणे अत्यावश्यक आहे. सर्व पदवी प्राप्त विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करीत आपल्या उज्ज्वल भवितव्यास शुभेच्छा देतो.

दीपप्रज्वलन झाल्यानंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या गीताने कार्यक्रमाची सुरूवात झाली. आज झालेल्या या सोहळ्यात पदवी आणि पदव्युत्तर पदवीच्या एकूण ६६ विद्यार्थ्यांना पदवी वितरित करण्यात आली. यामध्ये मास्टर ऑफ फिजिओथेरपीच्या १८ आणि बॅचलर ऑफ फिजिओथेरपीच्या ४८ विद्यार्थ्यांचा समावेश होता. तसेच शैक्षणिकदृष्ट्या उत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सुवर्णपदक आणि सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या वार्षिक पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. प्राचार्य डॉ. सरथ बाबू यांनी महाविद्यालयाच्या वार्षिक अहवालाची माहिती यावेळी सादर केली. सर्व विद्यार्थ्यांना यावेळी 'ओथ ऑफ अ फिजिकल थेरपिस्ट' ही शपथ देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.वैभव कापरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.संकेत मुंगीकर आणि डॉ.पायल ढवळे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त...

### एकाच वेळी दोन पेटंट्स प्राप्त करत डॉ. बालाजी कळंबे यांची दुहेरी कामगिरी

**लातूर :** दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. बालाजी गुरुनाथ कळंबे यांनी संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत सलग दोन डिझाइन नोंदणी प्रमाणपत्रे



मिळवली आहेत. भारत सरकारच्या द पेटंट ऑफिस, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया कडून त्यांच्या नावावर दोन स्वतंत्र डिझाइन्सची नोंदणी करण्यात आली आहे.

बँकिंग ऑपेरेशन्स मल्टि-अकाउंट मॅनेजमेंट डिव्हाईस आणि डिव्हाईस फॉर ऑटोमॅटेड डिटेक्शन ऑफ फ्राऊडलेंट फायनान्सिल ट्रांज्यशन यांचा समावेश आहे. ही दोन्ही डिझाइन्स बँकिंग आणि वित्तीय क्षेत्रातील तांत्रिक कार्यक्षमता वाढविणे, बहुखाती व्यवस्थापन सुलभ करणे आणि फसवणूक व्यवहारांचे स्वयंचलित निदान करण्यास उपयुक्त ठरणाऱ्या संकल्पनांवर आधारित आहेत. डिजाईन्स ॲक्ट २००० व नियम २००१ अंतर्गत ही नोंदणी मान्य करण्यात आली आहे.

डॉ. कळंबे हे दयानंद वाणिज्य महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असून त्यांच्या नावावर आता एकूण १० पेटंट्स नोंदणीकृत आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी संशोधन निबंध सादर केले असून शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचा कार्याचा आलेख सातत्याने उंचावत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी पीएचडीचे संशोधन पूर्ण करत आहेत, ही बाबही महाविद्यालयासाठी अभिमानास्पद आहे.

बँकिंग क्षेत्रातील डिजिटलायझेशन, सायबर सुरक्षा आणि फसवणूक प्रतिबंध यांसारख्या संवेदनशील विषयांवर केंद्रित ही कामगिरी लातूर जिल्ह्यासह मराठवाडा विभागासाठी प्रेरणादायी ठरली आहे. उद्योगशिक्षण क्षेत्रातील दुवा मजबूत करण्यासाठी अशा संशोधनाची मोठी गरज असताना डॉ. कळंबे यांनी केलेले योगदान उल्लेखनीय मानले जात आहे. महाविद्यालय प्रशासन, सहकारी प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्या या यशाबद्दल अभिनंदन केले असून, भविष्यातही अशाच नावीन्यपूर्ण संशोधनातून राष्ट्रीय स्तरावर महाविद्यालयाचा गौरव वाढवण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

### शिव जयंतीनिमित्त शिवव्याख्यान संपन्न

**अहमदपूर :** सावरगाव थोट येथे शिवाई प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त दि. १९ फेब्रुवारी रोजी हनुमान मंदिर येथे



शिवव्याख्यान घेण्यात आले. या कार्यक्रमात व्याख्याते प्रा. डॉ. प्रशांत बिरादार यांनी 'शिवाजी महाराजांचे शिवविचार आजच्या काळाची गरज' या विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी रावसाहेब पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून विजयकुमार किलचे, साहित्यिक रमेश भालेराव, विजय पवार व संगम पवार उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धांचे आयोजन करून विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. कार्यक्रमास गावातील शिवप्रेमी, महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक सूर्यकांत कोणाले तर सूत्रसंचालन बंडू शेळके यांनी केले. आभार दिनकर बडूरे यांनी मानले.

### सकल धनगर समाजाच्या वतीने नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. २२ फेब्रुवारी :** नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत धनगर समाजाचे निवडून आलेल्या नवनिर्वाचित सदस्यांचा निलंगा तालुका सकल धनगर समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

निलंगा तालुका सकल धनगर समाजाच्या वतीने नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील निवडून आलेल्या नवनिर्वाचित सदस्यांचा सत्काराचा कार्यक्रम निलंगा येथील शासकीय विश्रामग्रहावर आयोजित करण्यात आला होता. यावेळी निलंगा नगरपरिषद सदस्य सौ. राधिका मल्हारी पेठकर, स्वीकृत न.प. सदस्य प्रा. डॉ. गजेंद्र मधुकर तरंगे, कोकळगाव गणाचे पं. स. सदस्य सौ. जयश्री रत्नादीप घोडके, चिंचोली (स.) गणाचे पं.स. सदस्य सौ.सिंधू ग्यानबा हजारे, कासार सिरसी गणाचे पं. स. सदस्य विवेक भाऊराव कोकणे या नवनिर्वाचित सदस्यांचा सकल धनगर समाजाच्या वतीने सन्मानचिन्ह शाल श्रीफळ देऊन भव्य नागरी सत्कार करण्यात आला. तसेच नगरपरिषद निवडणुकीत सौ. संगीता म्हेत्रे व वलांडी जि.प. गटातून निवडणुकीत सूर्यकांत भोसले यांनी निवडणूक रिंगणात उतरून रनांग गाजवले पण त्यांना प्रभावाचा सामना करावा लागला पुढील काळात पुन्हा जोमाने व उत्साहाने काम करावे यासाठी प्रोत्साहन म्हणून त्यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्ष म्हणून डॉ. गिरीधर सूर्यवंशी तर प्रमुख म्हणून समाजाचे समाज भूषण ॲड गुंडेराव बनसोडे, व प्रमुख पाहुणे म्हणून चंदर मामा गोजरटे, सूर्यकांत भोसले, लक्ष्मण होळकर, दिनकर बिरादार आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी अनेक मान्यवारांनी आपले मनोगत व्यक्त करून नवनिर्वाचित सदस्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याच व्यासपीठावर नियोजित असलेल्या कासार सिरसी तालुक्यातील सकल धनगर समाजाच्या वतीने मदनसुरी येथील सामाजिक कार्यकर्ते अशोक सूर्यवंशी यांनी नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश सराटे यांनी केले, तर सामाजिक कार्यकर्ते तथा संपादक झार्टिंग अण्णा म्हेत्रे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी डॉ. सचिन अभंगे, नामदेव काळे, डॉ. बापूराव काळे यांच्यासहसकळ धनगर समाज बाधवांनी परिश्रम घेतले या वेळी तालुक्यातील समाज बांधवामोठ्या संख्याने उपस्थित होते.

# अंबुलगा साखर कारखान्याचा विस्तार; गाळप क्षमता दुप्पट अन् १५० केएलपीडी डिस्टिलरीला मंजुरी

## निलंगा विधानसभेचे आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या प्रयत्नांना यश; केंद्र सरकारचा हिरवा कंदील

**तभा वृत्तसेवा/श्रीशैल्य बिराजदार**

**निलंगा, दि. २२ फेब्रुवारी :** निलंगा तालुक्यातील अंबुलगा बु. येथील डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना लिज ओंकार साखर कारखाना प्रा. लि. च्या विस्तारीकरणाला केंद्र सरकारकडून अधिकृत मंजुरी मिळाली आहे. या निर्णयामुळे कारखान्याची गाळप क्षमता आता दुप्पट होणार असून, नवीन १५० केएलपीडी डिस्टिलरी प्रकल्पालाही मंजुरी मिळाल्याने परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केलेल्या पाठपुराव्याला या निमित्ताने यश आले आहे.

**पर्यावरण मंत्रालयाकडून 'ईसी' प्राप्त**

कारखान्याने सादर केलेल्या विस्तारीकरणाच्या प्रस्तावावर पर्यावरण तज्ज्ञ मूल्यमापन समिती (ईएसी) आणि केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने सकारात्मक निर्णय घेतला आहे. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी या प्रकल्पाला पर्यावरणीय मंजुरी (ईसी) प्रदान करण्यात आली आहे.

विस्तार योजनेनंतर कारखान्याचे स्वरूप पूर्णतः बदलणार असून, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे.दैनंदिन २५०० मे. टनावरून आता ४८०० मे. टन ऊस गाळप होणार.




१५० किलोलीटर प्रति दिन (केएलपीडी) क्षमतेचा बहुखाद्य आसवनी डिस्टलेरी प्रकल्प उभारला जाणार. यात सी-मोलॅसिस, बी-हेवी मोलॅसिस, उसाचा रस आणि धान्याचा वापर करून इथेनॉल निर्मिती करता येईल.

सह-वीजनिर्मिती: १८ मेगावॅट क्षमतेचा नवीन को-जनरेशन प्रकल्पही कार्यान्वित होणार आहे.

**शेतकऱ्यांचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार!**

निलंगा विधानसभा मतदारसंघातील उसाचा प्रश्न गेल्या काही काळापासून गंभीर होता. मात्र, आता कारखान्याची क्षमता दुपटीने वाढल्यामुळे शेतकऱ्यांना वेळेवर गाळपाची खात्री मिळणार आहे. कारखाना पूर्ण क्षमतेने चालणार असल्याने शेतकऱ्यांनी आता उसाच्या गाळपाबाबत चिंता करण्याची गरज नाही, असे कारखाना प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

या विस्तारीकरणामुळे केवळ गाळप वाढणार नाही, तर उपपदार्थांच्या निर्मितीतून कारखान्याची आर्थिक स्थिती भक्कम होईल. याचा थेट फायदा सभासद आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळणार आहे.

## एसटी महामंडळाच्या मनमानीमुळे प्रवाशांना त्रास

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. २२ फेब्रुवारी :** लातूर मधील अंतर अवघे वीस किलोमीटर मुळे औशातील ऐंशी टक्के लोक लातूरला विविध कामासाठी, कॉलेजसाठी, खरेदीसाठी आणि नोकरी साठी लातूरला येत असतात.

बसचा विचार केलातर सकाळी औशावरून दहा पर्यंत बस आहेत त्यानंतर बसचा ओघ कमी कमी होत जातो. बसस्थानक वाले सरळ सांगतात की, नवीन बससॅन्डवर जावा. नवीन बसस्थानकावर सुद्धा बस मिळत नाही नाईलाजाने मोडवर जावे लागते. तेथेही बस जेमतेमच असतात. त्यात निलंगा, सोलापूर आणि उमरगा येथून येणाऱ्या यांचा समावेश होतो. कधीकधी चा बस मोडवर थांबत नाहीत. अशावेळी खाजगी वाहनांचा आधार घ्यावा ला-



गतो. हा प्रकार औशावरून लातूरला येण्यासाठी करावा लागतो.लातूरवरून औशाला जाण्यासाठी कसरतच करावी लागते कारण साधारणपणे साडेसात वाजताची किनगाव औसा ही बस सोडली तर औसा आगाराची बस नाही. ज्या चुकारू किंवा लांब पल्लयाच्या बस मिळतात पण दररोज नाही. त्यामुळे औशाच्या प्रवाशां वर अन्याय होतो आहे.

औसा आगाराची बस लातूर सोलापूर धावते पण या बसमध्ये औशाचे प्रवाशी घेतले जात नाहीत. कारण विचारले असता ही जादा बस असल्याने औसा मोडवर सुद्धा थांबत नाही . निलंगा आणि उमरगा ह्या बस औसा मोड वर थांबतात. तेथून रिक्षा ने खाली जावे लागते. हा आर्थिक नुकसान प्रवाशांना सहन करावे लागत आहे.

आगार प्रमुखानी औसा ते लातूर या दरम्यान किमान चार बसची व्यवस्था केली तर दर पंधरा मिनिटानी एक बस सोडली तर प्रवाशांचा सोय होईल आणि लातूर वरून औशाला जाण्यासाठी रात्री किमान नऊ वाजेपर्यंत सोय होईल. त्यामुळेऔसा आगार प्रमुखानी यावर उपाय योजना करावी असे प्रवाशांचे मत आहे.

### जि. प. अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीची उत्सुकता

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ फेब्रुवारी :** जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीची जिल्ह्यातील नागरिकांना उत्सुकता लागून राहिली असून, जिल्हाधिकारी कधी निवडणूक लढविलेल्या राजकीय पक्षांना अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीचे निमंत्रण देतात, याकडे लक्ष लागले आहे. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी झाली. मतमोजणीनंतर आठ दिवसांत जिल्हाधिकाऱ्यांनी निवडून आलेल्या मोठ्या पक्षास अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीचे निमंत्रण द्यायला हवे होते.

सध्या जिल्हा परिषदेतील अधिकारी-कर्मचारी पदाधिकारी निवडीची तारीख कधी येते, याची वाट पाहात आहेत. सध्या कॉँग्रेस मोठा पक्ष असला तरी बहुमताचा आकडा गाठणे अवघड आहे. भाजप आणि राष्ट्रवादी (अ. प.) पक्षांनी मैत्रीची भूमिका पार पाडली तर अध्यक्ष, उपाध्यक्ष या दोनी पक्षाचा होऊ शकतो. सध्या फारशा हालचालीही दिसत नाहीत. मात्र, काही तरी फॉर्मूला ठरला असणार; परंतु, अजून बाहेर आलेला नाही. लवकर काही तरी भाजप-राष्ट्रवादी मैत्रीचा धर्म पाळतील, अशी चर्चा आहे.

## वलांडीत महिलांना उद्योग उभारणीचे धडे; ब्युटी पार्लर क्षेत्रात करिअरच्या संधी

### आत्मनिर्भर व्हा, कुटुंबाचा आधार बना : सरपंच राणीताई भंडारे यांचे आवाहन



**तभा वृत्तसेवा**

**वलांडी , दि. २२ फेब्रुवारी :** ग्रामीण भागातील महिलांनी केवळ चूल आणि मूल यात मर्यादित न राहता स्वतः चा लघुउद्योग सुरू करून आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे. विशेषतः ब्युटी पार्लरसारख्या क्षेत्रातून महिलांना उत्तम करिअर करण्याची संधी उपलब्ध असून, वलांडीतील महिलांनी या संधीचा लाभ घेऊन आत्मनिर्भर व्हावे, असे आवाहन सरपंच राणीताई भंडारे यांनी केले.

वलांडी येथे आशाराणी मेक ओव्हर ब्युटी पार्लरच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. ग्रामीण भागातील महिलांमध्ये कौशल्य असूनही मार्गदर्शनाअभावी त्या मागे राहतात, ही बाब लक्षात घेऊन या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

ब्युटी पार्लर: एक शाश्वत व्यवसाय

कार्यक्रमात बोलताना सरपंच भंडारे म्हणाल्या की, बदलत्या काळानुसार सौंदर्य प्रसाधने आणि ब्युटी पार्लर व्यवसायाला मोठी मागणी आहे. हा व्यवसाय कमी भांडवलात घरबसल्या सुरू करता येतो. महिलांनी केवळ प्रशिक्षण घेऊन थांबू नये, तर त्याचे व्यावसायिक रूपांतर करून आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावावा. ग्रामपंचायत स्तरावरूनही महिला उद्योजकांना आवश्यक ते सहकार्य करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

तज्ज्ञांचे मार्गदर्शन: शिबिरात अनुभवी प्रशिक्षकांनी ब्युटी पार्लरमधील विविध बारकावे, स्किन केअर, हेअर स्टाईल आणि मेकअप याविषयी प्रात्यक्षिकासह माहिती दिली.

शासकीय योजना: महिलांना उद्योग उभारण्यासाठी बँकांकडून मिळणारे कर्ज आणि शासकीय सबसिडी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सुलोचना बोडके, महादेवी नागलगावे,गंगा पांडे, शिल्पा टवानी, श्रवेता बिरादार, मीनाताई सोनकवडे, आयोजक अशा राणी नागलगावे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सहभाग: वलांडी व परिसरातील गरजू महिला आणि युवतींनी या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला बचत गटाच्या प्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

## शिवनेरी महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**शिरूरअनंतपाळ, दि. २२ फेब्रुवारी :** १९ फेब्रुवारी २०२६ रोजी शिरूरअनंतपाळ येथील शिवनेरी महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या वतीने स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. राजनारायण बिरादार उपस्थित होते, तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धालगडे सर यांनी अध्यक्षस्थान भूषविले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या चरित्रावर प्रभावी भाषणे केली. विद्यार्थ्यांनी महाराजांच्या शौर्य, स्वराज्य स्थापनेतील कार्य आणि लोककल्याणकारी धोरणांचा गौरवपूर्ण आढावा घेतला.

प्रा. डॉ. नारायण सूर्यवंशी यांनी आपल्या मनोगतातून शिवाजी महाराजांचे चरित्र उलगडून सांगितले. तरुणांनी महाराजांच्या विचारांचा आणि आचाराचा आदर्श घ्यावा, असे प्रतिपादन त्यांनी केले. शिवाजी महाराजांमुळेच मला इतिहासाची आवड निर्माण झाली आणि पुढे मी इतिहासाचा प्राध्यापक झालो. इतिहास हा सत्याच्या शोधासाठी अभ्यासला पाहिजे, इतिहासातील सत्याचा शोध घेत असताना. माझ्याकडून डॉक्टरेट कधी झाली हे माझ्या लक्षात सुद्धा आले नाही. असे प्रेरणादायी विचार त्यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांचा किमान एक तरी गुण आपल्या अंगी बाणवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

डॉ. अमोल लाटे यांनी शिवाजी महाराजांच्या पर्यावरण विषयक धोरणांवर सविस्तर माहिती देत त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण कार्याचा परामर्श घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हालसे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. अभिषेक घुमरे यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी तसेच तिन्ही शाखांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी इतिहास विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना केळीचे वाटप करण्यात आले.

# विकासकामात कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही- आ. अभिमन्यू पवार

## - विकासाचा ॲक्शन प्लॅन'- ३ वर्षांत १००% शेतरस्त्यांचे मजबुतीकरण - शहर कामांना वेग देण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. २२ फेब्रुवारी :** औसा मतदारसंघातील प्रलंबित शेतरस्ते, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा तसेच शहरातील विकासकामांचा वेग वाढवण्यासाठी औसा तालुका व कासार सिरसी मंडळाशी संबंधित विभागप्रमुखांची व्यापक प्रशासकीय बैठक झाली. या बैठकीत विविध विभागांच्या मंजूर व प्रलंबित कामांचा सखोल आढावा घेत ठोस कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले. विकासकामांमध्ये कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही,असा स्पष्ट इशारा आ.अभिमन्यू पवार यांनी यावेळी दिला असून दर्जेदार व वेळेत कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात आला.

औसा येथे विकासकामांना गती देण्यासाठी बैठक झाली.उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसिलदार घनशाम अडसुळ, गटविकास अधिकारी आनंदकुमार मिरगणे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील चौधरी, पोलिस निरिक्षक रेवनाथ ढमाळे यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीत मुख्यमंत्री बळीराजा शेत,पाणंद रस्ते योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांचा तपशीलवार आढावा घेण्यात आला. सुनिश्चित कार्यप्रणालीनुसार अडवलेली किंवा अपूर्ण राहिलेली कामे तातडीने मार्गी लावावीत, तांत्रिक व प्रशासकीय अडचणी तत्काळ दूर कराव्यात, असे निर्देश या बैठकीत देण्यात आले. मंडळनिहाय २५-२५ किलोमीटरचे क्लस्टर तयार करून प्रस्ताव सादर करावेत. ज्या रस्त्यांचे मातीकाम पूर्ण झाले आहे. अशा रस्त्यांना प्राधान्यक्रम द्यावा. असे स्पष्ट करण्यात आले.

पुढील तीन वर्षांच्या कालावधीत नकाशावरील व संमतीतील १०० टक्के शेत,पाणंद रस्त्यांचे मजबुतीकरण करुन १०० टक्के शिवरस्त्यांचे डांबरीकरण पूर्ण करण्यासाठी सर्वसमावेशक व टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणारा विकास आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. ग्रामीण भागातील शेतीमाल वाहतूक सुलभ होणे, शेतकऱ्यांचा खर्च कमी होणे आणि गावोगाव संपर्क सुधारणा होणे या उद्देशाने हे नियोजन प्रभावीपणे राबवावे.अशा सुचना संबंधितांना यावेळी देण्यात आल्या आहेत.



जिल्हा परिषद शाळांबाबतही बैठकीत विशेष चर्चा झाली. शाळांना आवश्यक त्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नवीन इमारतींचे बांधकाम, स्वच्छतागृहांची उभारणी, संरक्षण भिंती, किचन शेड उभारणीसाठी तातडीने प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश देण्यात आले. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सौरऊर्जा सुविधा, इंटरनेट कनेक्टिव्हिटी आदी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करावे. अशी सूचना करण्यात आली.प्रशासकीय दृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेत १ मे पासून किल्लारी अपर तहसीलदार कार्यालय तात्पुरत्या जागेवरून नियमितपणे कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक त्या सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. नागरिकांना शासकीय सेवा वेळेत व सुलभतेने मिळाव्यात, हा यामागील मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

औसा शहरातील प्रलंबित कामांचाही आढावा घेण्यात आला. औसा-उंबाडगा रस्ता तसेच औसा टी-पॉइंटपासून शहरात येणाऱ्या मुख्य रस्त्यालगतच्या नालीकामास तातडीने सुरुवात करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले. पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण करण्याचे नियोजन करावे.असे स्पष्ट करण्यात आले. शहरातील वाहतूक सुलभता, पाणी निचरा व्यवस्था आणि नागरी सुविधांमध्ये सुधारणा करण्यावर भर देण्यात आला.या बैठकीदरम्यान कृषी, महसूल, वन, मृद व जलसंधारण, महिला व बालकल्याण, आरोग्य, जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत मंजूर विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रत्येक विभागाने आपापल्या कामांची सद्यस्थिती, निधी उपलब्धता, तांत्रिक बाबी आणि पूर्णत्वाची कालमर्यादा यांची माहिती सादर केली. आवश्यक त्या ठिकाणी समन्वय वाढवून कामे गतीमान करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### प्रशासनाने जबाबदारीने काम करावे- आ. अभिमन्यू पवार

नागरिकांच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी प्रशासनाने जबाबदारीने काम करावे, असे निर्देश आमदार पवार यांनी दिले.औसा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

## रोखठोक

**दिनेश गुणे**

# प्रस्तावनेचे नवे पान

उद्या, सोमवारपासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील दुसरे अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबईच्या विधान भवनात सुरू होईल. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येस प्रथेप्रमाणे मुख्यमंत्री विरोधकांसमवेत चहापानाचा सोहळा आयोजित करतील आणि विरोधकांनी प्रथेप्रमाणे चहापानावर बहिष्कार वगैरे घातला नाही, तर ती आजच्या दिवसाची सर्वात मोठी बातमी ठरेल. कारण मुख्यमंत्र्यांनी चहापानाचा कार्यक्रम आयोजित करावयाचा आणि विरोधकांनी काही कारणे सांगत सरकारवर टीका करून त्यावर बहिष्कार टाकावयाचा, असे गेल्या अनेक वर्षांत सातत्याने दिसत आले आहे. विरोधकांचा बहिष्कार ही बातमी असली, तरी ती आता पुरती गुळगुळीत झाली असून तिचे महत्त्व केवळ दखल घेण्यापुरते राहिले आहे. अशा काळात सामंजस्याने सरकारसोबत अधिवेशन काळात सहकार्य करावे, अनेक प्रश्न सोडविण्यासाठी सरकारला साथ द्यावी आणि राज्याच्या हितासाठी राजकारण बाजूला ठेवून सत्ताधारी व विरोधी पक्ष ही लोकशाहीच्या रथाची दोन चाके असतात, हे दाखवून देण्यासाठी चहापानाच्या कार्यक्रमासाठी हजेरी लावण्यापासून समंजस सुरुवात करावी, असे घडले तर ती मोठी बातमी होईल. आज तसे घडलेच, तर तो एक ऐतिहासिक प्रसंगदेखील ठरेल. त्यामुळे उद्यापासून सुरू होणाऱ्या अधिवेशनाचे रंग नेमके कसे असतील, याचे उत्तर आज संध्याकाळच्या चहापान बैठकीच्या वातावरणातून मिळणार आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येस अधिवेशन काळात सरकार आणि विरोधकांची भूमिका कशी असेल, याचे सर्वसाधारण विश्लेषण करण्याचा माध्यमांचाही प्रघात असतो. दीर्घकाळापासून सुरू असलेल्या या प्रघातानुसार, 'अधिवेशनात सरकारला धारेवर धरण्याची विरोधकांची रणनीती' असाच सहसा मथळा दिसत असला, तरी अलिकडच्या कामकाजाच्या इतिहासात मात्र विरोधकांवर सत्ताधाऱ्यांकडून राजकीय कुरघोडीच केली जात असल्याने विरोधकांची भूमिका हा मोठा औत्सुक्याचा विषय होत चालला आहे. राज्यात सत्ताधारी बाजूला महायुती नावाचे एक संघटित ऐक्य आणि दुसरीकडे महाविकास आघाडी या नावाने एकत्र असूनही परस्परांत फारसा समन्वय नसलेले, राजकीयदृष्ट्या काहीसे संभ्रमित विरोधक असेच चित्र दिसते. अधिवेशनातील भूमिका किंवा राजकीय खेळींमध्येही विरोधकांची दमछाक होत असल्याने, अधिवेशनांबाबत सर्वसामान्य जनतेत अलिकडे फारशी उत्सुकता राहिलेली दिसत नाही.

साधारणपणे अधिवेशनाच्या पूर्वसंध्येच्या विश्लेषणात, अधिवेशनामध्ये विरोधक कोणत्या मुद्यावर सरकारला धारेवर धरणार, कोणत्या समस्यांविरोधात आवाज उठविणार आदी बाबींची चर्चा होत असते. उद्यापासून सुरू होत असलेल्या अधिवेशनात, ६ मार्च रोजी २०२६-२७ महाराष्ट्राचा अर्थसंकल्प सादर होणार आहे. देवेंद्र फडणवीस यांनी सत्ताग्रहण केल्यानंतरच्या महायुती सरकारच्या वाटचालीत, विकास हा राज्य कारभाराचा परवलीचा मंत्र ठरला आहे. 'महाराष्ट्र आता थांबणार नाही' ही ग्वाही देणाऱ्या फडणवीस सरकारच्या गेल्या सव्वा वर्षांच्या कार्यकाळात महाराष्ट्रात सुधारणा आणि विकासाचे नवे पर्व सुरू झाले. यंदाच्या अर्थसंकल्पात या वाटचालीला वेग देणाऱ्या काही धडाकेबाज योजना अर्थमंत्री या नात्याने खुद्द देवेंद्र फडणवीस जाहीर करतील, ही अपेक्षा साहजिकच व्यक्त होत आहे. राज्याच्या शिरावर सुमारे नऊ लाख कोटींचे कर्ज असल्याचे सांगण्यात येते. आजवर राज्यातील कोणत्याही सरकारने महाराष्ट्रास कर्जमुक्त ठेवलेले नाही. विरोधकांच्या सत्ताकाळातही महाराष्ट्र कर्जाच्या बोझ्याखाली होताच; पण फडणवीस सरकारच्या काळातील कर्जाच्या बोझ्याचे भांडवल करून अर्थसंकल्पीय अधिवेशन काळात विरोधक सरकारला घेरण्याची तयारी करीत असल्याचे विश्लेषण नक्कीच माध्यम क्षेत्रात दिसेल. महाराष्ट्रात काही महत्त्वाकांक्षी प्रकल्प येऊ घातले आहेत. अगदी अलिकडे तिसरी मुंबई हा महाराष्ट्राचा नवा, झगझगीत चेहरा ठरणारा प्रकल्पही सरकारने घोषित केला आहे. मुंबई वॉटर मेट्रोसारखा एक प्रकल्पदेखील राज्य सरकारचा ड्रीम प्रोजेक्ट म्हणून साकारण्याच्या टप्प्यावर आहे. या प्रकल्पांसाठी मोठी तरतूद हे नव्या अर्थसंकल्पाचे वेगळेपण राहील, असे सांगितले जाते. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी सुरू करण्यात आलेली योजना अनेक कारणांमुळे वादग्रस्त ठरली. अनेक अपात्र लाभार्थींनी या योजनेचा गैरफायदा घेतल्याचे उघड झाल्याने राज्याच्या तिजोरीवर मोठा आर्थिक भार पडल्याचेही स्पष्ट झाले. एकूणच विकास प्रकल्पांकरिता आवश्यक असलेला निधी आणि राज्याच्या तिजोरीवर 'लाडकी बहीण'सारख्या योजनांमुळे पडणारा ताण यांतून मार्ग काढत विकास प्रकल्प राबविण्याची सरकारची इच्छाशक्ती व वास्तविक स्थिती यांचा मेळ घालण्याचे चातुर्य फडणवीस यांना दाखवावे लागणार असल्याने, अर्थसंकल्पीय अधिवेशनात लाडकी बहीण योजनेच्या सुनियोजित अंमलबजावणीबाबतच्या विवेकी धोरणाचीही अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शेतकरी कर्जमाफीबाबतचा अहवाल अद्याप अंमलबजावणीच्या प्रतीक्षेत आहे. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी मिळणार की काही विशेष पॅकेजची घोषणा होणार, याकडे सर्वांचे लक्ष आहे.

याच अधिवेशनादरम्यान राज्यसभेच्या सात रिक्त जागांकरिता निवडणुका होणार आहेत. विरोधकांचे संख्याबळ घटल्याने, ही निवडणूक मोठी रंगतदार ठरणार असून काही दिग्गज विरोधी नेत्यांच्या भवितव्याचा फैसला होणार आहे. सत्ताधारी महायुती या निवडणुकीत विरोधकांना धोबीपछाड देणार का, याचीही चर्चा सध्या सुरू आहे. जून २०२२ मध्ये झालेल्या राज्यसभा निवडणुकीत त्यावेळी विरोधी पक्षनेता असलेल्या देवेंद्र फडणवीस यांनी सत्ताधारी आघाडीवर केलेल्या राजकीय कुरघोड्यांची मोठी चर्चा झाली होती. ती केवळ जागांची निवडणूक नव्हती, तर अंकगणित व्यवस्थापन आणि राजकीय रणनीतीचे कौशल्य दाखविणारी लढत ठरली. त्या वेळी राज्यात महाविकास आघाडी सत्तेवर होती. संख्याबळाच्या गणितानुसार, आघाडीचे चार आणि भारतीय जनता पार्टीचे दोन उमेदवार विजयी होणे अपेक्षित होते. मात्र, सहाव्या जागेसाठी काट्याची लढत झाली आणि फडणवीस यांच्या रणनीतीने महाविकास आघाडीला जेरीस आणले. अपक्ष आणि लहान पक्षांच्या आमदारांशी संपर्क साधून मतांची जुळवाजुळव करत, राजकारणात अंकगणिताच्या पलीकडे व्यवस्थापन महत्त्वाचे ठरते हे त्यांच्या रणनीतीने दाखवून दिले. काही आमदारांनी आघाडीच्या अधिकृत उमेदवाराऐवजी भाजपच्या उमेदवारास मत दिल्याचा चर्चा झाली आणि क्रॉस व्होटिंगमुळे निकालाची समीकरणे बदलली. मतदानानंतर काही मतांच्या वैधतेवर भाजपाने आक्षेप घेतला आणि काही मते अवैध ठरल्याने, निकाल भाजपाच्या बाजूने झुकला. भाजपाचा तिसरा उमेदवार विजयी ठरला आणि सत्ताधारी महाविकास आघाडीला अपेक्षित असलेली अतिरिक्त जागा गमवावी लागली. विरोधी पक्षनेते असूनही फडणवीस यांनी सत्ताधाऱ्यांच्या संख्याबळावर मात केली, हा संदेश राज्याच्या राजकारणात गेला आणि सत्ताधारी महाविकास आघाडीवरील या राजकीय कुरघोडीचे पडसाद पुढे झालेल्या विधान परिषद निवडणुकीतही दिसून आले. ही खेळीच पुढे शिवसेना फुटीची राजकीय प्रस्तावना ठरली, असे अनेक विश्लेषक मानतात. हा इतिहास ताजा असताना, संख्याबळाचे अंकगणित आता तर महाविकास आघाडीस कोणत्याही दृष्टीने पोषक नसल्याने सात जागांसाठी होणाऱ्या राज्यसभा निवडणुकीत पुन्हा एकदा कुरघोडीचा खेळ रंगणार का, ही यंदाच्या अधिवेशनातील सर्वाधिक उत्सुकतेची बाब ठरणार, यात शंका नाही.



महाराष्ट्राच्या विधिमंडळाच्या इतिहासात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राजकीय कलगीतुरा होत असतो. दोन्ही बाजूंचे खेळाडू पट्टीचे व राजकारणात पुरते मुरलेले असल्याने, सरकारला कोंडीत पकडण्याची संधी विरोधक सोडत नाहीत, तर विरोधकांना नामोहरम करण्याची संधी सत्ताधारी हातची जाऊ देत नाहीत. त्यामुळेच गेल्या अनेक अधिवेशनांत राज्याच्या अनेक महत्त्वाच्या समस्या मार्गी लागल्या, अनेक घोटाळ्यांना वाचा फुटली आणि अनेकांचे बुरखेदेखील फाटले. खरे म्हणजे राजकारणात एकमेकांना सांभाळून घेण्याची मानसिकता लपून राहात नाही. 'काचेच्या घरात राहणाऱ्यांनी दुसऱ्यांवर दगडफेक करू नये', असा सल्ला सत्ताधारी किंवा विरोधक एकमेकांना देत असतात. एखाद्या घोटाळा किंवा भ्रष्टाचाराचे लक्तरे चव्हाट्यावर येऊ लागली की त्यापाठोपाठ अनेक घोट्याळ्यांची प्रकरणे समोर येऊ लागतात आणि 'हमाम में सब नंगे' हे वाक्यदेखील आठवू लागते. तरीही अशा प्रकरणांना वाचा फोडण्याचा प्रभावी मंच म्हणून विधिमंडळाचे महत्व आणि या मंचाची जबाबदारी अबाधित राहिली आहे. सन २०१२ च्या सुमारास, जलसंपदा विभागातील कथित अनियमिततेचे प्रकरण विधिमंडळातच गाजले. तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर आरोप करीत विरोधकांनी सरकारला धारेवर धरले. सत्ताधारी व विरोधकांतील तीव्र राजकीय संघर्ष महाराष्ट्राने अनुभवला आणि चौकशांची चक्रे फिरू लागली. या एकाच प्रकरणाने महाराष्ट्राच्या निवडणुकांचे कथानकच बदलून गेले. 'विकास' विरुद्ध 'भ्रष्टाचार' हे निवडणुकीच्या प्रचाराचे केंद्रस्थानीचे मुद्दे ठरले. ग्रामीण भागात प्रशासनाविरोधातील अविश्वासाची भावना वाढली आणि जनतेचा विश्वास नव्याने संपादन करण्याचे मोठे आव्हान तत्कालीन सरकारपुढे उभे राहिले. त्याआधी सन २०१० च्या सुमारास मुंबईतील आदर्श गृहनिर्माण संस्थेतील भ्रष्टाचाराचे प्रकरणही विधिमंडळाच्या मंचावर उजेडात आले आणि पारदर्शक राज्यकारभाराचा मुद्दा ऐरणीवर आला. शहरी जमिनींच्या वाटप प्रक्रियेस शिस्त लावण्यास भाग पाडणाऱ्या या प्रकरणाने महाराष्ट्राच्या राजकारणातील भविष्यकालीन पडझडीसाठीचे अनेक धक्के देऊन ठेवले. सहकारी साखर कारखाने, सहकारी बँकांमधील कथित अनियमिततेची अनेक प्रकरणे विधिमंडळातच गाजली आणि केंद्रीय संस्थांच्या कारवायांचा सपाटा महाराष्ट्रात सुरू झाला. राजकीय सूडभावना आणि भ्रष्टाचारविरोधी लढा अशी दोन टोकाची मते या कारवायांनंतर चर्चिली जाऊ लागली, पण सहकार क्षेत्राच्या शुद्धीकरणाच्या दृष्टीने ही प्रकरणे महत्त्वाची ठरली. सहकार क्षेत्रातील शासन-प्रशासन व्यवस्थेस शिस्त लावण्याच्या देशव्यापी प्रक्रियेची सुरुवात झाली. राजकीय पक्षांतील फाटाफूट, राज्यातील उद्योगांचे स्थलांतर, राजकीय वरदहस्त लाभलेल्या नेत्यांची खंडणीखोरी, असे अनेक मुद्दे महाराष्ट्र विधिमंडळाच्या याच मंचावरून उजेडात आले आहेत.

हा इतिहास मोठा आहे. त्याचे एकत्रित राजकीय व सामाजिक परिणामदेखील राज्याच्या पुढील वाटचालीसाठी महत्त्वाचे ठरले आहेत. काही घटनांमुळे व्यक्तिकेंद्री राजकारणासमोर आरसा धरला गेला, काही घटनांमुळे राज्यपाल, सभापती, न्यायालये यांच्या भूमिकांवर चर्चा झडल्या, स्थैर्य आणि सत्तेतील सहभाग या बाबी तात्त्विक भूमिकांपेक्षा मोठे असल्याचे राजकीय वास्तवही याच मंचामुळे स्पष्ट झाले तर आरक्षण, सहकार, प्रादेशिक असमतोलासारख्या मुद्यांवर तोडगा काढण्यातही याच मंचाने महत्त्वाची भूमिका पार पाडली. महाराष्ट्राची राजकीय परंपरा सहकार, प्रादेशिक संतुलन आणि वैचारिक बहुविधतेवरच आधारलेली आहे. परंतु गेल्या दोन-चार दशकांत विधिमंडळातील आरोप-प्रत्यारोप, सत्तास्पर्धेतील नाट्यमय व अनेकदा अनाकलनीय वाटणाऱ्या घडामोडी, पक्षफुटी अशा अनेक कारणांमुळे राजकारणासही वेगळी वळणे मिळत गेली. या काळात केवळ सत्तांतराचा, सत्तेच्या समीकरणांचा किंवा आरोप-प्रत्यारोपांचा प्रश्न नव्हता, तर तो संस्थात्मक स्थैर्य, नैतिकता आणि समाजमानसातील बदलाच्या प्रक्रियेस कोणती दिशा मिळते, हा प्रश्न महत्त्वाचा ठरला होता. म्हणूनच यात विधिमंडळाची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. मंत्रिपदावरील नैतिक दडपण, चौकशी यंत्रणांवर जनतेचे खिळलेले लक्ष आणि समाजातील जागरूकता हे त्याचे सकारात्मक परिणाम ठरले. काही प्रकरणांमुळे, ग्रामीण विकासाच्या परंपरागत कथानकाला धक्के बसले, निवडणुकांतील पठडीबाज प्रचाराचा बाज बदलत गेला आणि प्रशासनास जनतेचा विश्वास संपादन करण्याचे आव्हान पेलावे लागले. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्राच्या विधिमंडळातील आरोप-प्रत्यारोप हे केवळ व्यक्ती वा पक्षापुरते मर्यादित राहिले नाहीत. त्यांनी राज्याच्या राजकीय संस्कृतीलाही नवी वळणे आणि नवा आकार दिल्याचे दिसते. या प्रक्रियेतून कधी ध्रुवीकरण वाढले, तर कधी संस्थात्मक प्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित झाले. पुढील काळात राजकारणातील स्थैर्य, पारदर्शकता आणि सामाजिक सलोखा ही मूल्ये जपली जातील की आरोप-प्रत्यारोपांची परंपरा तीव्र होईल, असा प्रश्न वाटण्याच्या टप्प्यावर आजचे राजकारण थांबले आहे. कारण अनेक प्रश्नांवर सरकार आणि विरोधक यांच्या भूमिकांमध्ये परस्पर विरोध दिसतो. सामंजस्याचा अभाव असेल तर प्रश्न सुटण्याऐवजी बिकट होतात. त्यामुळे प्रत्यक्ष कार्यवाहीचा वेग किंवा परिणामदेखील थंडावतात, असेही दिसून आले आहे. सामाजिक आरक्षणाबाबत सरकारची भूमिका आणि विरोधकांचे मुद्दे हे दाखल्यादाखल सांगता येतील. सामाजिक तणावाच्या वातावरणात असे काही मुद्दे भर घालतात, असेही दिसून आले आणि आरक्षणासारखे प्रश्न केवळ कायदेशीर नव्हे, तर सामाजिक संतुलनाचे प्रश्न ठरतात, हे स्पष्ट झाले. आरोग्य, शिक्षण, उद्योग, पायाभूत सुविधा आदी मुद्यांवर सरकार आणि विरोधकांमध्ये सहकार्य असेल तर या क्षेत्रांचा विकास वेग घेतो. वेदान्त-फॉक्सकॉन प्रकल्प महाराष्ट्राबाहेर गेल्याच्या त्या वादानंतर, राज्य सरकारवर ठपका ठेवत विरोधक आक्रमक झाले, पण त्यानंतर राज्यात विदेशी गुंतवणुकीसाठी फडणवीस सरकारने कंबर कसली. आज महाराष्ट्र हे परकी गुंतवणूकदारांच्या पहिल्या पसंतीचे राज्य ठरले आहे. राज्याराज्यांतील औद्योगिक विकासाच्या सुदृढ स्पर्धेस त्यामुळे चालना मिळाली आहे. अशा स्पर्धेतून रोजगार निर्मितीलाही चालना मिळेल आणि रोजगारांची दीर्घकालीन समस्या सुटेल, असे आशादायक चित्र आज दिसू लागले आहे. अलिकडेच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राज्यातील जनतेने सत्ताधारी महाविकास आघाडीला दिलेला कौल हा त्याचाच सकारात्मक परिणाम असू शकतो. म्हणूनच विधिमंडळात जन्म घेणारा मुद्दा हा परिवर्तनाच्या नव्या कहाणीच्या प्रस्तावनेचे नवे पान असतो. या कहाणीचे कथानक कसे लिहावयाचे ते सामंजस्याने ठरले पाहिजे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### पीक विमा योजना - काही प्रश्न

अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट यांच्या तडाख्यात वारंवार उद्ध्वस्त होणाऱ्या शेतकऱ्यांना एक भक्कम सुरक्षा कवच म्हणून मोदी सरकारने फेब्रुवारी २०१६ मध्ये प्रधानमंत्री फसल बीमा योजना अर्थात पीएमएफबीवाय सुरू केली होती. या योजनेला १० वर्षे पूर्ण होत आहेत. आता ही योजना विमा कंपन्यांसाठी नफ्याची खाण बनली आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. केवळ तीन वर्षांच्या कालावधीत विमा कंपन्यांनी प्रीमियमच्या रूपाने तब्बल ८२,०१५ कोटी रुपये जमा केले. याच काळात शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून केवळ ३४,७९९ कोटी रुपये मिळाले. म्हणजेच विमा कंपन्यांनी ४७,००० कोटी रुपयांहून अधिक निव्वळ नफा कमावला. हरयाणामधील काही भागांत शेतकऱ्यांनी आपले विमा दावे नाकारले जात असल्याबद्दल आणि त्यात होणाऱ्या दीर्घ विलंबाच्या विरोधात धरणे आंदोलने केली. एकीकडे शेतकऱ्याचे पीक बुडालेले असते, संसार उघड्यावर पडलेला असतो; दुसरीकडे विमा कंपनीचे प्रतिनिधी कागदपत्रांच्या चक्रव्यूहात त्याला अडकवून ठेवतात. ज्या योजनेत भ्रष्टाचाराचे आरोप होतात, त्या योजनेचा लाभ खऱ्या शेतकऱ्यांपर्यंत किती प्रमाणात पोहोचत असेल, याची कल्पना करणेही कठीण आहे. या पृष्ठभूमीवर योजनेच्या तंत्रज्ञान वापराबद्दल मात्र सकारात्मक बोलता येईल. उपग्रह छायाचित्रण, ड्रोन तंत्रज्ञान आणि संगणकीय उत्पादन अंदाज प्रणाली यांचा वापर करण्याचा प्रयत्न या योजनेत झाला आहे. ८४.८ कोटी शेतकऱ्यांसाठी डिजिटल ओळखपत्र, भौगोलिक संदर्भावर आधारित पीक सर्वेक्षण आणि थेट लाभ हस्तांतरण यासारखे उपाय पारदर्शकता आणण्यास मदत करू शकतात. रिझर्व्ह बँकेने किसान क्रेडिट कार्ड योजनेत प्रस्तावित केलेला सुधार म्हणजे पीक चक्राशी कर्जाची मुदत जोडणे हे स्वागतार्ह पाऊल आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून थेट लाभ हस्तांतरण करणे, कर्ज मिळविणे सोपे करणे या गोष्टी उपयुक्त आहेत. सध्याच्या शेती पद्धतीमुळे जागतिक नायट्रोजनचे प्रमाण सुरक्षित मर्यादेच्या दुप्पटीहून अधिक झाले आहे. हे केवळ पर्यावरणाची समस्या नाही तर येणाऱ्या पिढ्यांच्या जगण्याचा प्रश्न आहे. भारताच्या संदर्भात हा अहवाल सांगतो की इथे अजूनही धान्यावर आधारित आहार प्रचलित आहे आणि २०५० पर्यंत शाश्वत खाद्य सुरक्षा सुनिश्चित करायची असेल तर अधिक भाज्या, फळे, सुकामेवा आणि शेंगांचा समावेश आहारात वाढवावा लागेल.

परंतु यामुळे अनेक खाद्यपदार्थांच्या किमती वाढू शकतात आणि आधीच आर्थिक ताणाखाली असलेल्या सामान्य कुटुंबांना हे परवडणे कठीण आहे. शिवाय आहार बदल नेहमीच साध्य नसतो. भूजलाचा बेसुमार उपसा रोखणे, जमिनीची होणारी धूप थांबवणे आणि शेतीतील जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करणे या गोष्टींशिवाय दीर्घकालीन शाश्वत शेती शक्य नाही. पीएमएफबीवाय या योजनेतील सुधारणांबद्दल बोलायचे तर सर्वप्रथम विमा कंपन्यांच्या कामगिरीवर कडक आणि पारदर्शक अंकेक्षण होणे आवश्यक आहे. प्रीमियम आणि दाव्यांचे प्रमाण वाजवी राखण्यासाठी नियामक चौकट अधिक भक्कम करायला हवी. विमा क्षेत्रात निष्पक्ष स्पर्धा सुनिश्चित केली तर शेतकऱ्याला अधिक फायदा होऊ शकतो. दाव्यांचे जलद निपटारे होणे ही तर सर्वात महत्त्वाची गरज आहे. शेतकऱ्याचे नुकसान झाल्यावर त्याला ताबडतोब भरपाई मिळायला हवी. या प्रक्रियेत स्वतः शेतकऱ्यांचा सहभाग वाढविणे अत्यावश्यक आहे. तसे झाले तरच या देशाचा अन्नदाता खऱ्या अर्थाने सुरक्षित होईल आणि त्याचे जगणे सन्मानाचे होईल.

**विकास परसराम मेश्राम**/७८७५५९२८००

### सूक्ष्म सूत्रात हितोपदेश

संस्कृत भाषेचे सौंदर्य आगळेच आहे. अत्यंत अल्प शब्दांत मोठा आशय व्यक्त करणारी भाषा असल्याने आचार्यांनी अनेक उक्ती उपदेशात्मक केल्या आहेत. स्थान आणि भ्रष्टता यासाठी उपयोगात आणलेले उदाहरण बरेच सूचक आहे.

सूत्रः- स्थानं भ्रष्टाते नखः नरः केशः

रचनाकारांनी भ्रष्ट या शब्दाचा द्व्यर्थी उपयोग केला आहे. भ्रष्ट म्हणजे स्थान सोडणे, स्थानापासून विलग होणे, काढून टाकणे किंवा पदच्युत होणे इत्यादी अर्थ अभिप्रेत आहेत. दुसरा अर्थ सध्या बराच प्रचलित असून नैतिक मूल्यांना सारून व्यवहार करणे, अधिकाराचा गैरवापर करून धन स्वीकारणे असा आहे. आपल्या हात-पायांच्या दोन बोटांच्या अग्रस्थानी नखे असतात. बोटांचे कवच असल्याने दुखापती पासून संरक्षण व्हावे म्हणून शरीरातील अस्थी धातूपासून तयार झालेली नखे बोटांना मजबुती देतात. नखे बेढब वाढली असतील, त्यात मळ साचला असेल तर हात विद्रूप दिसतात. स्त्रिया या नखांद्वारे बोटांचे सौंदर्य खुलवण्यासाठी विशेष काळजी घेतात. विशिष्ट आकार आणि रंग दिल्याने त्यांच्या सौंदर्यात भर पडते. हीच नखे बोटांपासून विलग केली तर ती टाकावीच लागतात तसेच आपल्या डोक्यावर असलेल्या काळ्याशार केसांमुळे व्यक्तिमत्त्व खुलते, आकर्षक होते. पुरुषापेक्षा स्त्रिया या केसांच्या बाबतीत खूपच हळव्या आणि संवेदनशील असतात. हे केस जोपर्यंत डोक्यावर त्यांचे स्थानी व्यवस्थित आहेत पर्यंतच त्यांचे सौंदर्य किंवा किंमत आहे. एकदा या केसांनी त्यांची जागा म्हणजे डोकं सोडले किंवा गळून पडले तर त्या केसाला कवडीची ही किंमत राहत नाही. असेच मनुष्याचेही आहे. येथे स्थान म्हणजे पद असे अपेक्षित आहे. मनुष्य त्यांचे कार्यकालात ज्या पदावर आहे; मग ते शासकीय, खाजगी, सार्वजनिक किंवा राजकारणात असो तोपर्यंतच त्यास महत्त्व किंवा किंमत आहे. एकदा त्याने स्थान सोडले किंवा त्यास पदच्युत केले गेले तर त्यास महत्त्व राहत नाही, असा जगरहाटीचा संकेत आहे. सूत्रकारांनी सूक्ष्म चिंतनातून व्यावहारिक स्थूल विचार स्पष्ट करून प्रत्येक स्थानाची निगा ठेवणे त्यांचे महत्त्व व पावित्र्य जपणे किती महत्त्वाचे आहे हे सांगितले आहे. मनुष्याला मिळालेले स्थान भ्रष्ट होऊ नये, तो पदच्युत होऊ नये म्हणून हे सूत्र ध्यानात ठेवणे महत्त्वाचे आहे.

**संजय पाठक**/९४२२१४७६७७

### अल्पवयीन ड्रायव्हिंग : पालकांचा 'रुबाब' की निष्पापांचा 'काळ!'



सद्यस्थितीत शाळा-महाविद्यालयांत जाणारी अल्पवयीन मुले रस्त्यांवर दुचाकी आणि चारचाकी वाहने सुसाट वेगाने दामटताना दिसतात. वाहतूक अधिनियमानुसार १८ वर्षांखालील मुलांना वाहन चालविण्याचा परवाना नसतानाही, पालकांच्या मूक संमतीने ही मुले रस्त्यावर मृत्यूचे तांडव घडवत आहेत. अलिकडच्या काळात पुणे, दिल्ली आणि बंगळुरूमध्ये घडलेल्या भीषण अपघातांनी समाजाच्या संवेदनशीलतेवर आणि न्यायव्यवस्थेच्या भूमिकेवर झणझणीत अंजन घातले आहे. काही दिवसांपूर्वी पुण्यातील कल्याणीनगर भागात एका प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिकाच्या अल्पवयीन मुलाने दारूच्या नशेत, आपली आलिशान 'पोर्शे' कार भरधाव दामटत एका दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दोन तरुण अभियंत्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण देश हादरला. असाच एक संतापजनक प्रकार पश्चिम दिल्लीतील द्वारका भागात घडला. एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलाने चालविलेल्या महिंद्राच्या स्कॉर्पिओ कारने एका मोटारसायकलला धडक दिली. या अपघातात अवघ्या २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. हा तरुण त्याच्या कुटुंबाचा एकमेव आधार होता; त्याचे वडील आधीच वारले होते आणि आता त्याच्या आईने कोणाच्या जिवावर जगावे, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे. बंगळुरूच्या होसकोटे-डोब्बासपेट रिंग रोडवर झालेला अपघात तर काळजाचा थरकाप उडवणारा होता. एका १७ वर्षीय मुलाने चालवलेली कार ताशी १५०-१६० किमी वेगाने धावत होती. वेगावर नियंत्रण न राहिल्याने कार डिव्हायडर ओलांडून विरुद्ध दिशेला गेली आणि ट्रक व दुचाकीला धडकली. या भीषण अपघातात कारमधील सहा विद्यार्थ्यांचा जागीच अंत झाला.

या सर्व घटनांमध्ये एक समान दुवा आहे; तो म्हणजे 'पालकांचे अक्षम्य दुर्लक्ष'. मोटार वाहन कायद्यानुसार, अल्पवयीन मुलाने गुन्हा केल्यास पालकांना २५,००० रुपये दंड आणि ३ वर्षांच्या तुरुंगवासाची तरतूद आहे तसेच वयाची २५ वर्षे पूर्ण होईपर्यंत त्या मुलाला परवाना नाकारला जातो. मात्र, केवळ कागदावरचे कायदे रस्ते सुरक्षित करू शकत नाहीत. मुलाला महागडी गाडी देणे हे प्रेमाचे लक्षण नसून ते एक प्रकारे त्याला गुन्हेगारीच्या खाईत ढकलणे आहे. वेगाच्या नशेपेक्षा जिवाचे मोल मोठे आहे, हे मुलांना पटवून देणे ही काळाची गरज आहे. रस्त्यावर धावणारी ही वाहने नसून चालते-फिरते 'मृत्यूचे सापळे' बनले आहेत. जर पालकांनी वेळीच आवर घातला नाही आणि न्याय व्यवस्थेने अशा प्रकरणांत कठोर भूमिका घेतली नाही, तर हे सुसाट वेग अनेकांचा बळी घेत राहतील. या अल्पवयीन चालकांवर आणि त्यांच्या पालकांवर कोणताही मुलाहिजा न ठेवता कडक कायदेशीर कारवाई करणे अपेक्षित आहे.

**अविनाश देशपांडे** /९४२२९५०७५०

### वर्धा रोड महामार्गावरील फाट्यांवर गंभीर अपघाताचा धोका

महामार्गांवर तसेच शहरांत रस्ता दुभाजकांवर सौंदर्यीकरणासाठी झाडे लावण्यात आलेली आहेत. हा सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वाहतूक विभागाचा हा एक स्तुत्य उपक्रम आहे. यामुळे शहराचे सौंदर्य खुलते यात शंकाच नाही, परंतु हीच झाडे अपघातासाठी कारणीभूत, जीवघेणी ठरू नयेत म्हणून ही सूचना व नम्र विनंती.

महामार्गावरील पांजरी (हॉटेल ले मेरिडियनजवळील) फाट्यावर गंभीर अपघाताचा धोका निर्माण झालेला आहे. पांजरी गावाकडून वर्धा रोडवरील फाट्यावर नागपूरकडे वळण घेताना विरुद्ध दिशेने म्हणजे वर्धेकडून येणारी भरधाव वाहने तेथील रस्ता दुभाजकांवर सौंदर्यीकरणासाठी लावण्यात आलेल्या झाडांमुळे अजिबात दिसत नाहीत. त्यामुळे वळण घेताना वर्धेकडून येणारी भरधाव वाहने वळण घेणाऱ्या वाहनावर भरवेगात आदळण्याचा धोका निर्माण झालेला आहे. चौक नसल्यामुळे तेथे ट्रॅफिक सिग्नल नाहीत. तेथे या आधीही अपघात झालेला आहे. संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वाहतूक विभागाला विनंती आहे की, त्यांनी येथील दुभाजकावरील सौंदर्यीकरणासाठी लावण्यात आलेली दोन्ही बाजूकडील झाडे किमान १०० मीटरपर्यंत काढून टाकण्यात यावी तसेच तेथे कसलेली जाहिरातींचे फलक लावण्यात येऊ नये; जेणेकडून वळण घेताना दोन्ही बाजूंनी येणाऱ्या गाड्या किमान १०० मीटरपर्यंत तरी दिसतील आणि गंभीर अपघाताचा धोका टळेल. रात्रीच्या वेळेला अंधारात हा धोका प्रामुख्याने जाणवतो. प्रत्येक फाट्यावर प्रखर दिव्याची व्यवस्था करण्यात यावी. कुठल्याही महामार्गावरील प्रत्येक फाट्यावर, चौकांत, किमान १०० मीटरपर्यंत सौंदर्यीकरणासाठी झाडे लावण्यात येऊ नये. लावलेली झाडे किमान १०० मीटर पर्यंत काढून टाकण्यात यावीत. शहरांतही हा नियम पाळण्यात यावा. शहरात प्रत्येक फाट्यावर, चौकांत किमान ५० मीटरपर्यंत झाडे काढून टाकण्यात यावीत व भविष्यात लावली जाणार नाहीत, याची काळजी घेण्यात यावी. सौंदर्यीकरणासाठी लावण्यात आलेली झाडे कुठल्याही अपघातासाठी कारणीभूत ठरू नयेत एवढीच सार्वजनिक बांधकाम विभाग व वाहतूक विभागाकडून रास्त अपेक्षा आहे.

**मोरेश्वर दिगंबर बेलसरे** /९८९०६६४६६१

### 'वन्दे मातरम'ची १५० वर्षे

सध्या वंदे मातरम गीताचा १५० वर्षसोहळा सुरू आहे. त्यानिमित्ताने केंद्र-राज्य सरकार यांना विनंती आहे की, आपण ज्याप्रमाणे घरोघरी श्री सत्यनारायण, श्री सत्यविनायक, श्री सत्यअम्बा, श्री सत्य मारुती, श्री वरद शंकर अशा अनेक पूजा करतो त्याचप्रमाणे पां. कृ. सावळापूरकर रचित भारतमाता पूजा आहे; तीसुद्धा मोठमोठ्या कार्यक्रमांच्या माध्यमातून झाली तर वंदे मातरम गीताबद्दल जो मुस्लिम समाजात गैरसमज आहे तो दूर होण्यास मदत होईल म्हणूनच त्यासाठी सरकारच्या माध्यमातून ती पोथी अल्प किमतीत प्रकाशित करून प्रसारित करावी.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७



### 'जय जिजाऊ जय शिवराय'

शिवजयंतीनिमित्त अनेक ठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले गेले. अनेक तरुणांनी आपल्या मोटारसायकलला शिवरायांचे झेंडे लावले होते. वरवर पाहता खरंच तरुणांमध्ये शिवभक्ती ओसंडून वाहत आहे, असे दृश्य होते. संध्याकाळी मी माझ्या मुलाला गाडीवर घेऊन जात असताना पेट्रोल पंपवर थांबले. दोन तरुण मुलीही बाजूच्या रांगेत पेट्रोल भरण्यासाठी उभ्या होत्या. तितक्यात शिवाजी महाराजांचा झेंडा मोटारसायकलला लावलेले दोन तरुण मुलं तिथे आले आणि त्या मुलींकडे पाहून वाहनाचा हॉर्न वाजवणे, हसणे अशा कृती करू लागले. माझ्या जिवाचा संताप झाला. पुढे एका घरी कामानिमित्त गेली असता त्या घराच्या अंगणात एक छोटं कॅफे होतं. बाहेर एक शिवाजी महाराजांचा झेंडा लावलेली गाडी पार्क केली होती. अंगणात जाताच तिथे चार-पाच तरुण मुलं-मुली गळ्यात गळे घालून थिल्लर चाळे करीत होते. आता मात्र हे पाहून मन अधिकच खिन्न झालं. शिवाजी महाराजांचा झेंडा लावून फिरायची तरी यांची पात्रता आहे का? यांना म पासून मावळे माहीतच नाहीत. यांना म म्हणजे मस्ती, माज, मद्य याच गोष्टी माहीत आहेत. दोष फक्त त्यांचाच नाही तर पालकांचाही तेवढाच दोष आहे. आम्ही नोकऱ्या करू, घर चालवू की मुलांच्या मागे फिरू, हे पालकांचे ठरलेले वक्तव्य. अगदी बरोबर आहे. पण मुलांना नको त्या वयात महागड्या वस्तू, मोबाईल, बाईक्स न देणे हे तर पालकांच्या हातात आहे. अति लाडामुळे आणि सतत त्यांना एका संरक्षणाखाली ठेवल्यामुळे मुलं मनाने इतकी कमकुवत झाली आहे की, त्यांना रागावण्याचा हक्कही आई-वडील गमावून बसले आहेत. नाही तर हे पोरं घर सोडून जाणार, आत्महत्येचा प्रयत्न करणार इतकी टुकार पिढी आपणच बनवत आहोत. आपण खूप आदर्श पालक जरी बनू शकत नाही तरी आपल्या पाल्यांना किमान स्वतःसाठी करीअर करीत असताना सामाजिक जाणीव, सामाजिक कार्य, स्वरक्षण, स्त्रियांचा मान राखणे आदी गोष्टी निश्चित शिकवू शकतो. सतत मुलांना संरक्षण न देता त्यांचा बाहेरच्या जगात स्वबळावर काहीतरी चांगलं मिळविण्याची ताकद द्या, कठीण परिस्थितीवर मात करून यश मिळविण्याची शिकवण द्या, तेव्हा एक सशक्त पिढी पुढे येईल. आयत्या मिळालेल्या स्वराज्याची किंमत ठेवा आणि मनामनांत, आपल्या कृतीत शिवाजी महाराज, जिजाऊ, मावळे ठेवा. तेव्हाच खऱ्या अर्थाने 'जय जिजाऊ जय शिवराय' या आपल्या घोषाला पूर्णत्व आणि खरा अर्थ प्राप्त होईल.

**प्रांजली र. भिवापूरकर**

### हरवत चाललेली वाडा संस्कृती

शहर केवळ रस्त्यांनी, पुलांनी आणि उंच इमारतींनी बनलेले नाही, ते आठवणींनी, परंपरांनी आणि वास्तूंनी विणलेले आहे. त्या वास्तूंमध्ये सर्वात जिव्हाळ्याची, बोलकी आणि भावनिक नाळ जुळलेली रचना म्हणजे 'वाडा.' आजही जुन्या वाड्याच्या भग्न भिंतींकडे पाहिले की इतिहासाचे ठसे जाणवतात. वाड्यांच्या सावल्यांत उभं राहिलं की काळ मागे फिरतो. पण हा काळाचा प्रवाह जसजसा वेग घेतो आहे, तसतशी 'वाडा' संस्कृती हळूहळू धूसर होत चालली आहे. वाडा म्हणजे केवळ घर नव्हे, तो एक जगण्याचा मार्ग होता. चौकातले तुळशीवृंदावन, सकाळच्या काकड आरतीचा नाद, अंगणात खेळणारी लेकरं, ओसरीवर बसून चालणाऱ्या गप्पा आणि माजघरातल्या सण-समारंभांची लगबग, हे सगळं मिळून 'वाडा' तयार होत असे. वाडा संस्कृती पेशवाईच्या काळात फुलली. राजकारण, प्रशासन, शिक्षण आणि कला या सर्वांचे केंद्र वाड्यांभोवतीच फिरत होते. वाडा हा सत्तेचा, संस्कृतीचा आणि समाजजीवनाचा केंद्रबिंदू होता. वाडा ही पर्यावरणाशी सुसंवादी रचना होती. लाकूड, दगड, माती, चुन्याचा गिलावा, या नैसर्गिक साहित्यांचा वापर करून उभारलेले हे बांधकाम उन्हाळ्यात गार आणि हिवाळ्यात उबदार असे. पावसाचे पाणी साठवण्याची सोय, नैसर्गिक प्रकाशाचा योग्य वापर, वाऱ्याची खेळती दिशा हे सगळं शास्त्रीय पद्धतीने आखलेलं असे. आज 'सस्टेनेबल आर्किटेक्चर' म्हणून ज्या संकल्पना मांडल्या जातात, त्या आपल्या वाड्यांत काही शतकांपूर्वी जगल्या गेल्या होत्या. बदल हा निसर्गाचा नियम आहे. औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या यामुळे शहराचा चेहरा बदलू लागला. वाड्यांच्या जागी अपार्टमेंट्स उभी राहू लागली. अंगण हरवले, चौक बुजले, ओसऱ्या बंद झाल्या. माणसं शेजाऱ्यांच्या खिडकीतून डोकावण्याऐवजी लिफ्टमध्ये नजरा चुकवू लागली. वाड्यांतल्या



सामूहिकतेची जागा वैयक्तिकतेने घेतली. एकेकाळी सण-उत्सवांनी गजबजणारे चौक आता सिमेंटच्या भिंतींत कैद झाले. प्रश्न असा आहे की, आपण काय गमावत आहोत? वाडा पाडताना आपण केवळ एक रचना पाडत नाही, आपण एक संस्कृती, एक जीवन पद्धती, एक भावविश्व नष्ट करत असतो. वाड्यांच्या ओसऱ्यांवरूनच सामाजिक संवादाची परंपरा रुजली. तिथेच कीर्तनं झाली, तिथेच वाचन संस्कृती वाढली, तिथेच मुलांना संस्कार मिळाले. वाडा हा एक शाळा होता, एक रंगमंच होता, एक मंदिर होता. आजही काही वाडे शिल्लक आहेत. त्यांच्या भिंतींवर काळाचे ओरखडे आहेत, त्या अजूनही उभ्या आहेत, जणू सांगत आहेत, 'आम्हाला वाचवा.' वाडा म्हणजे भूतकाळाची केवळ आठवण नाही, तो भविष्याचा मार्गदर्शकही आहे. पर्यावरणपूरक बांधकाम, सामूहिक जीवनशैली, सांस्कृतिक एकात्मता, या मूल्यांची गरज आज अधिक आहे. आधुनिक वास्तूंमध्येही वाड्यांच्या संकल्पना समाविष्ट करता येऊ शकतात. मध्यवर्ती चौक, नैसर्गिक प्रकाश, शेजारधर्म, या गोष्टी नव्या रूपात पुन्हा जिवंत होऊ शकतात. वाडा संस्कृती हरवली तर शहर उरेल, पण आत्मा हरवेल.

**विलास कोळी**/ ९७६३०८४४९९

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समूह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८७५२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# परळीसाठी अभिमानास्पद: रामरक्षा गोशाळेला महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय 'देशी गोवंश सन्मान' पुरस्कार प्रदान



तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ : प्रतिनिधी |** पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन तसेच महाराष्ट्र गोसेवा आयोग यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'महाराष्ट्र राज्य देशी गोवंश सन्मान' योजनेंतर्गत रामरक्षा प्रतिष्ठान संचलित रामरक्षा गोशाळेला राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले.

परळी वैजनाथ येथे आयोजित समारंभात मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. देशी गोवंश संवर्धन, गोसेवा आणि संशोधन क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा सन्मान देण्यात आला. पुरस्कार वितरण सोहळ्यास पशुसंवर्धन विभाग सचिव डॉ. एन. रामास्वामी, आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीण कुमार देवरे, गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा तसेच सदस्य सुनील सूर्यवंशी, उद्धव नेरकर, सनतकुमार गुप्ता आणि नितीन मार्कंडेय उपस्थित होते. रामरक्षा गोशाळेचे संचालक रतन कोठारी यांनी मान्यवरांच्या हस्ते हा मानाचा पुरस्कार स्वीकारला.

आदर्श गोशाळा म्हणून ओळख

परळी वैजनाथ पंचक्रोशीत गेल्या अनेक वर्षांपासून रामरक्षा गोशाळा सेवाभाव, तळमळ आणि प्रामाणिकपणाने कार्यरत आहे. कोठारी परिवाराच्या पुढाकारातून गोसेवा म्हणून सुरू करण्यात आलेली ही गोशाळा आज राज्यातील अग्रगण्य गोशाळांपैकी एक म्हणून ओळखली जाते. या ठिकाणी मोठ्या संख्येने देशी गोधनाचे संगोपन केले जाते. गोधनाच्या आरोग्याची काळजी, शाश्वत गोपालन पद्धती, जनजागृती उपक्रम तसेच विविध संशोधनात्मक प्रयोग राबविण्यात येतात. परिसरात देशी गोवंश संवर्धनाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण करण्यात संस्थेची भूमिका महत्त्वाची ठरली आहे.

परळीकरांसाठी अभिमानाची बाब

पशुसंवर्धन विभागाने राज्यस्तरीय पातळीवर या कार्याची दखल घेत सन्मान केल्याने परळीकरांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. रामरक्षा गोशाळेला मिळालेला हा पुरस्कार परळी तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरली असून, सर्व स्तरांतून संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

गोसंवर्धन आणि शाश्वत शेतीपूरक उपक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याच्या दृष्टीने अशा उपक्रमांना प्रोत्साहन मिळणे आवश्यक असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या कार्यालयात मन की बात व टिफिन बैठक संपन्न



**बीड |** प्रदेश सूचनेनुसार, लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख यांच्या उपस्थितीत आज देशाचे पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांची मन की बात व टिफीन बैठक कार्यक्रम भाजपा जिल्हा कार्यालयात संपन्न झाला. सरळ ॲप, नमो ॲप, पंडित दीनदयाळ उपाध्याय कार्यशाळा, वक्ता सूची आदी विषयी सर्वांना मार्गदर्शन केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी नवनाथ आण्णा शिराळे, गणेशजी लांडे, इर्शाद भाई, शांतीनाथ डोरले, डॉ. अभय वणवे, विक्रांत हजारी, ॲड. भाग्यश्रीताई ढाकणे, मनोज काका पाटील, ज्योतिबा नन्नवरे, डॉ. रवींद्र घुंबरे, सुनीलजी मिसाळ, ॲड. नागेश तांबारे, प्रमोद पुसरेकर, अमोल वडतिले, राजू शहाणे, संभाजी सुर्वे, महादेव नागरगोजे, नरेश पवार, राजेश चरखा, सुशील जाधव, अशोक घोडके, भालचंद्र गवळी, राजेश गवळी, केशव बडे यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिवजयंतीदिनी नवजात बालकांना आरोग्यदायी बेबी किटचे वितरण व मातांचा सन्मान



तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) |** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जन्मोत्सवाचे औचित्य साधत परळी वैजनाथ येथील उपजिल्हा रुग्णालयात दिनांक १९ फेब्रुवारी म्हणजे शिवजयंती दिनी जन्म घेतलेल्या पाच नवजात बालकांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तसेच गुरु शिष्य प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने आरोग्यदायी बेबी किटचे वितरण करण्यात आले. यावेळी नवजात बालकांच्या मातांचा देखील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व गुरु शिष्य प्रतिष्ठान च्या वतीने साडी चोळी भेट देत सन्मान करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, येथील उपजिल्हा रुग्णालयात शिवजयंतीसारख्या प्रेरणादायी दिनी जन्मलेल्या चिमुकल्यांचे स्वागत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व गुरु शिष्य प्रतिष्ठानच्या वतीने अनोख्या पद्धतीने करण्यात आले. नवजात शिशूंच्या आरोग्याची काळजी घेण्याचा संदेश या आरोग्यदायी बेबी किट वितरणाच्या उपक्रमातून आयोजकांकडून समाजाला देण्यात आला. नवजात शिशूंच्या संगोपनासाठी आवश्यक असलेल्या वस्तूंचा समावेश असलेले बेबी किट बालकांच्या मातांना सुपूर्द करण्यात आले. या किटमध्ये मच्छरदाणी, बाळांचे हँड ग्लोज, सॉक्स, बाळांचे कपडे, स्वच्छता साहित्य, ब्लँकेट, साबण, तेल, आदींसह आरोग्यविषयक उपयुक्त वस्तूंचा समावेश असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष तथा गुरु शिष्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष वैजनाथराव सोळंके यांनी दिली.

यावेळी नवमातांचा सन्मानही साडी-चोळी भेट देऊन करण्यात आला. मातृत्वाचा गौरव करत त्यांच्या आरोग्याची आणि नवजात बाळांच्या संगोपनाची जबाबदारी घेण्याचा संदेश या उपक्रमाच्या माध्यमातून देण्यात आला. या कार्यक्रमास उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अरुण गुट्टे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष तथा नगरपरिषदेचे गटनेते व गुरु शिष्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष वैजनाथ सोळंके, माजी उपनगराध्यक्ष रवींद्र परदेशी, माजी नगरसेवक जालिंदर नाईकवाडे, ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे, पत्रकार धनंजय आढाव, श्रीराम लांडगे, बालाजी घोडके, हनुमान आगरकर तसेच रुग्णालयातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

या उपक्रमामुळे रुग्णालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. सामाजिक बांधिलकी जपत नवजात बालकांच्या आरोग्य संवर्धनासाठी असे उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे यावेळी सदरील उपक्रमाच्या आयोजक तथा नगरपालिकेचे गटनेते वैजनाथराव सोळंके यांनी सांगितले.

## पर्यावरण, जैविक संवर्धनासाठी भारतभ्रमण अवलिया युवकांचे परळीत स्वागत, परळीच्या अक्षय मुंडेचा सहभाग



तभा. वृत्तसेवा

**परळी / प्रतिनिधी |** विकासाच्या नावाखाली होत असलेला पर्यावरणाचा ऱ्हास पर्यायी जैविक विविधतेचे नुकसान याची जनजागृती करत पर्यावरण संवर्धन आणि जैव विविधता टिकविण्यासाठी देशभरात असलेल्या व्याघ्र प्रकल्पला भेट देणाऱ्या युवकांचा परळी येथील नागनाथ निवासी विद्यालयाच्यावतीने सत्कार व सन्मान करण्यात आला.

विकासाच्या नावाखाली आजमितीस मोठ्या प्रमाणावर पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला आहे.जल, जंगल, जमीन, नदी यांचे अस्तित्व नष्ट होत असल्याने पर्यायी यावर अवलंबून असलेली जैव विविधता नष्ट होत चालली आहे. पर्यावरणातील अन्न साखळी बिघडत जात असल्याने सजीवसृष्टीवर विपरीत परिणाम होत असल्याने परळी येथील आयोध्या नगर मधील रहिवासी असलेला युवक अक्षय मुंडे व त्याचा मित्र नागपूर येथील आशिष नागपूरकर यांनी पर्यावरण संवर्धन आणि जैव विविधता जतन आणि संवर्धन उपक्रम हाती देशभरात असलेल्या ५८ व्याघ्र प्रकल्पाला सफारी करत याबाबत जनजागृती करत आहेत. या अवलिया युवकांच्या या कामी रिलायन्स फौंडेशनकडून देखील दक्षिण आफ्रिका या देशाचा अभ्यास दौरा करण्याची संधी प्राप्त मिळाली असून अक्षय मुंडे हा परळी येथील नागनाथ निवासी विद्यालयाचे सहशिक्षक ज्ञानोबा मुंडे यांचा मुलगा असून त्याच्या या सफारी दरम्यान परळी येथे आले असता विद्यालयाच्या वतीने अक्षय याची आई मिराबाई मुंडे, व सहकारी मित्र यांचा विद्यालयाच्या वतीने हृदपूर्वक सत्कार व सन्मान करून पुढील प्रवास करण्याकरिता प्रेरणा देण्यात आली.

## चनई येथे रोटरीचे मोफत आरोग्य तपासणी शिबिर; २५० ग्रामस्थांवर औषधोपचार



तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व छत्रपती शंभुराजे प्रतिष्ठान, चनई यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या निमित्ताने चनई (ता. अंबाजोगाई) येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये गावातील २५० ग्रामस्थांची आरोग्य तपासणी व औषधोपचार करण्यात आले.

या शिबिरामध्ये मधुमेह, हृदयरोग, वात-पित्त-कफ विकार, मुळव्याध तसेच दंत रोगांची तपासणी करण्यात आली. यासोबतच ब्लड शुगर टेस्टिंग, बी.पी. तपासणी, व गरजेनुसार ईसीजी तपासणी करण्यात आली. रुग्णांना आवश्यक ते मोफत औषधोपचार देऊन पुढील उपचारांसाठी मार्गदर्शन करण्यात आले.

या शिबिरासाठी , डॉ. नवनाथ घुगे, डॉ .अतुल शिंदे, डॉ. पल्लवी लोमटे, डॉ. सचिन पोतदार, डॉ. सुरेश आरसुडे व डॉ. इमरान अली यांनी रुग्णतपासणी केली.

सर्व डॉक्टरांनी निःस्वार्थ सेवाभावातून नागरिकांची तपासणी करून योग्य सल्ला दिला. या उपक्रमाचे प्रकल्प प्रमुख बालासाहेब कदम, संयोजक रमेश देशमुख, संतोष मोहिते यांनी संपूर्ण जबाबदारी स्वीकारून नियोजन व अंमलबजावणी यशस्वीरीत्या पार पाडली.

या प्रसंगी डॉ. नवनाथ घुगे, डॉ. सचिन पोतदार, डॉ. अतुल शिंदे, डॉ. सुरेश आरसुडे, कल्याण काळे, धनराज सोलंकी, सचिव मंजुषा जोशी, संतोष मोहिते, प्रदीप झरकर, बालासाहेब कदम, प्रा .अजय पाठक, रुपेश रामावत, गोपाल पारिख, राजेंद्र घोडके, स्वप्निल परदेशी, अजित देशमुख, गणेश राऊत, बालाजी घाडगे उपस्थित होते.

## खर्डेवाडी येथे गुरुवारपासून श्रीमद् भागवत कथा सोहळ्याला प्रारंभ

**बीड |** जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या त्रिशतकोत्तर बीज उत्सवानिमित्त तसेच किसनराव कळेकर आणि कै. रत्नदीप भागवत कळेकर यांच्या पुण्यस्मरणार्थ खर्डेवाडी (ता. बीड) येथे गुरुवार दि. २६ फेब्रुवारी २०२६ पासून श्रीमद् भागवत कथा सोहळ्याचा शुभारंभ होत आहे. नांदूर फाट्याजवळील खर्डेवाडी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही तुकाराम बीज उत्सव मोठ्या भक्तीभावात व उत्साहात साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने ह.भ.प. रामचंद्र महाराज जगताप (बीड) यांच्या वाणीतून श्रीमद् संगीत भागवत कथा निरूपण होणार आहे.

## आदर्श आवरगावचा 'सैराट' गौरव: रिंकू राजगुरूंकडून विकासकामांचे कौतुक

तभा. वृत्तसेवा

**धारूर (प्रतिनिधी) |** निसर्गरम्य परिसर, स्वच्छ रस्ते आणि नियोजित विकासकामांमुळे संपूर्ण जिल्ह्यात चर्चेत असलेल्या आवरगाव (ता. धारूर) येथे 'सैराट' फेम प्रसिद्ध अभिनेत्री रिंकू राजगुरू (आर्ची) यांनी भेट दिली. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत झालेल्या या भेटीने केवळ आवरगावच नव्हे, तर संपूर्ण धारूर तालुक्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शुक्रवार, २० फेब्रुवारी रोजी रिंकू राजगुरूंचे आगमन होताच ग्रामस्थांनी त्यांचे जल्लोषात स्वागत केले. यावेळी त्यांनी गावातील विविध विकासकामांची बारकाईने पाहणी केली. गावातील स्वच्छता, शिस्त आणि ग्रामस्थांचा सहभाग पाहून त्या भारावून गेल्या. "या गावाला कोणाचीही नजर लागू नये," अशा शब्दांत त्यांनी आवरगावच्या प्रगतीचे कौतुक केले. एका सेलिब्रिटीने गावाच्या कामाची दखल घेणे, हा गावातील प्रत्येक नागरिकाच्या कर्तव्याचा विजय मानला जात आहे. या भेटीदरम्यान रिंकू राजगुरूंच्या हस्ते अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम पार पडले:

पर्यावरण संदेश: भव्य वृक्षलागवड करून पर्यावरणाचा वारसा जपण्याचा संदेश दिला.

महिला सक्षमीकरण: महिला बचत गटाच्या 'फूड स्टॉल'चे उद्घाटन करून ग्रामीण अर्थचक्राला बळ दिले.

आरोग्य सेवा: रक्तदान शिबिरातील रक्तदात्यांना आणि मधुमक्षिका पालन प्रशिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप केले.

पर्यटन: गावाच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या 'सेल्फी पॉईंट'चे लोकार्पण करण्यात आले.

या कार्यक्रमास धारूरचे गटविकास अधिकारी वैजनाथ लोखंडे, नगराध्यक्ष बालासाहेब जाधव, पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे आणि आदर्श सरपंच अमोल सर्जेराव जगताप यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. आदर्श ग्रामपंचायत अधिकारी बाळासाहेब झोंबाडे आणि उपसरपंच नवनाथ नखाते यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले. शीतल व अविनाश जगताप यांनी सूत्रसंचालन करत कार्यक्रमात रंगत भरली.

## औरंगपूर येथे प्रति देहू श्रीक्षेत्र पावनधाम न्हाऊन निघणार!

### अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद् भागवत कथा व भव्य गाथापारायन सोहळ्याची भक्तिमय पर्वणी



तभा. वृत्तसेवा

**केज |** जगद्गुरू श्रीसंत तुकाराम महाराज सदेह वैकुंठ गमन सोहळ्यानिमित्त औरंगपूर येथे प्रति देहू श्रीक्षेत्र पावनधाम येथे अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद् भागवत कथा व भव्य गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा आठ दिवसीय भक्तिमय सोहळा दि. २६ फेब्रुवारी २०२६ (गुरुवार) रोजी प्रारंभ होऊन दि. ०५ मार्च २०२६ (गुरुवार) रोजी सांगता होणार आहे. या सप्ताहामुळे संपूर्ण परिसरात भक्ती, नामस्मरण आणि अध्यात्मिक वातावरणाची निर्मिती होणार आहे.

सप्ताहाच्या दरम्यान दररोज पहाटे ४ ते ६ काकडा आरती, सकाळी ७ ते १२ गाथा पारायण, दुपारी २ ते ५ श्रीमद् भागवत कथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ आणि रात्री ९ ते ११ कीर्तन, संगीत भजन व हरिजागर असा दैनंदिन कार्यक्रम राहणार आहे.

या सप्ताहात विविध मान्यवर कीर्तनकारांची उपस्थिती लाभणार आहे. दि. २६ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. एकनाथ महाराज हांडे (पंढरपूर), दि. २७ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. डॉ रामकृष्ण महाराज लहवितकर (नाशिक), दि. २८ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील (बुलढाणा), दि. ०१ मार्च रोजी ह.भ.प. श्रीगुरु पुंडलिक महाराज देहूकर यांचे कीर्तन होणार असून प्रवचन ह.भ.प. देवव्रत राणा महाराज वासकर यांचे राहील. दि. ०२ मार्च रोजी ह.भ.प. उमेश महाराज दशरथे (आळंदी) यांचे कीर्तन व ह.भ.प. योगी निरंजन नाथजी महाराज (विश्वस्त श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदी) यांचे प्रवचन होईल. दि. ०३ मार्च रोजी ह.भ.प. विश्वनाथ महाराज वारींगे (मुंबई) तर दि. ०४ मार्च रोजी ह.भ.प. अच्युत महाराज दस्तापूरकर यांचे कीर्तन होईल. व दि. ५ मार्च रोजी महंत श्री महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या किर्तनाने या सोहळ्याची सांगता होईल.

# पुत्राच्या स्मृती जपण्यासाठी पालकांचे दातृत्व ; मंदिरासाठी एकर जमीन दान

## चंदनवाडी येथे श्री तेजस्वी महादेव मंदिराचा भूमिपूजन सोहळा

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** तालुक्यातील चंदनवाडी येथील रहिवासी असलेले श्री. अरूण वसंतराव गित्ते आणि सौ.कौशल्या अरूणराव गित्ते यांनी आपल्या दिवंगत तरूण मुलगा तेजस याच्या स्मृतीप्रित्यर्थ एक सामाजिक आणि धार्मिक आदर्श समाजासमोर ठेवला आहे. तेजस याचे गतवर्षी महाशिवरात्रीच्या दिवशी हृदय विकाराने दुर्दैवी अकाली निधन झाले होते. या दुःखद घटनेतून सावरत असतानाच, आपल्या लाडक्या लेकाची आठवण कायमस्वरूपी जपली जावी, या उदात्त हेतूने त्यांनी चंदनवाडी (ता. अंबाजोगाई) गावातील नियोजित श्री तेजस्वी महादेव मंदिरासाठी गावालगत असलेली एक एकर जमीन दान केली आहे.

स्व.तेजस अरूणराव गित्ते (वय २१ वर्षे) हा पुणे येथे बी.कॉम पदवीचे शिक्षण घेत होता. तो शिवभक्त होता. भगवान महादेववर त्याची नितांत श्रद्धा होती. अतिशय देखणा, उमदा, आई-वडिलांचा आज्ञाधारक असलेल्या तेजस याचे गतवर्षी ऐन महाशिवरात्रीच्या दिवशी हृदय विकाराने दुर्दैवी अकाली निधन झाले होते. आपल्या तरूण मुलाच्या निधनानंतर त्याच्या स्मृती कायमस्वरूपी जतन करण्यासाठी अंबाजोगाई तालुक्यातील चंदनवाडी येथील रहिवासी असलेले श्री.अरूण आणि सौ.कौशल्या अरूणराव गित्ते यांनी एक सामाजिक आणि धार्मिक आदर्श समाजासमोर ठेवत मंदिराला एक एकर जमीन दान केली आहे. नुकताच या नियोजित मंदिराचा भूमिपूजन सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या नियोजित श्री तेजस्वी महादेव मंदिरामुळे गावाच्या विकासाला चालना आणि श्रद्धेला हातभार लागणार आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, दान केलेली ही जमीन मंदिरासाठी वापरली जाणार आहे. मुलाच्या निधनानंतर सुतकात न बसता, त्याच्या नांवाने काहीतरी चांगले घडावे असा विचार या दांपत्याने केला. गित्ते कुटुंबाच्या या निर्णयामुळे संपूर्ण गावातून त्यांचे कौतुक होत आहे. मुलाचे जाणे ही जरी मोठी हानी आहे, पण त्याच्या नांवाने होणारे हे कार्य अनेकांच्या उपयोगी पडेल, अशी भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली. गावकऱ्यांच्या वतीने या दात्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी) यांनी सांगितले की, आजचा हा दिवस आपल्या चंदनवाडी गावासाठी अत्यंत पवित्र आणि अभिमानाचा क्षण आहे. भगवान शिव यांच्या कृपेने आपण सर्वजण महादेव मंदिराच्या भूमिपूजनासाठी येथे एकत्र आलो आहोत. पण, हा फक्त मंदिराचा भूमिपूजन सोहळा नाही. तर हा एका लेकराच्या स्वप्नाचा, त्याच्या श्रद्धेचा आणि त्याच्या नितळ भावनेचा साक्षीदार असलेला क्षण आहे. कै.तेजस अरूण गित्ते या तरूण, उमद्या लेकराच्या मनात एक पवित्र विचार होता की, देवासाठी माझं शेत अर्पण करायचं. आज तो आपल्यामध्ये नाही, ही वेदना मनाला चटका लावणारी आहे. परंतू, त्याचे शब्द, त्याची भावना आणि त्याचं स्वप्न आजही जिवंत आहे. कारण, त्याच्या गित्ते कुटुंबियांनी त्या स्वप्नाला मान दिला, त्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी देवाला जागा अर्पण केली. ही केवळ जमीन नाही. तर यापुढे ही श्रद्धेची भूमी आहे. ही त्यागाची भूमी आहे, ही एका मुलाच्या पवित्र स्वप्नाची भूमी आहे. चला, आपण सर्वजण मिळून प्रार्थना करूया महादेवाच्या चरणी त्या पवित्र आत्म्यास शांती लाभो आणि हे मंदिर गावाच्या ऐक्याचं, श्रद्धेचं आणि विकासाचं प्रतीक बनो. हर-हर महादेव..! असे जिल्हाध्यक्ष ॲड.चव्हाण म्हणाले. यावेळी सूर्यभान मुंडे (सभापती, परळी वैजनाथ) यांच्यासह चंदनवाडी येथील समस्त गावकरी मंडळी व पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते.

दीनदयाळ नागरी सहकारी बँक म., अंबाजोगाई
DNS Bank Ltd. Ambajogai
"दीनदयाळ भवन", परळी रोड, अंबाजोगाई. जि.बीड ४३१५१७. फोन-२४४६-२४६९२६/२७फॅक्स-२४४६-२४६९२७
जाहीर प्रगटन — दिनांक २१.०२.२०२६

१. **कर्जदार:-** शेख जावेद सदरोदीन,पत्ता:- इदगाह नगर, बीड ता.जि.बीड ४३१ १२२
२. **जामीनदार:-**उमर शेख आलम शेख पत्ता:- सय्यद अली नगर मेरंजी, बीड, ता.जि.बीड ४३१ १२२
३. **जामीनदार:-**मोहम्मद जाकेर ताहेर पत्ता:-सहारा कॉलनी, शहेंशाह नगर,बीड, ता.जि.बीड४३१ १२२
४. **जामीनदार:-** शेख शाहेद इमामोद्दीन पत्ता:- मोमीनपुरबीड, ता.जि.बीड४३१ १२२

| वाहनाचा तपशील | |
|---|---|
| वाहन क्र. | MH 23 BC 0358 |
| रंग- | पांढरा |

बँकेने उपरोक्त वाहन खरेदी करिता उपरोक्त वाहनाचे तारणावर कर्ज रु.८.०० लक्ष दिले होते सदर कर्जाची परतफेड अनियमित असल्याने व पुढे सदर कर्ज थकल्याने बँकेन सदर कर्जदारा विरोधात वसुली प्रमाणपत्र मिळवुन केलेल्या कार्यवाही दरम्यान दिनांक २०.०२.२०२६ रोजी उपरोक्त कमांकाचे वाहन (फोटो मधील जप्त केले आहे. या बाबत वाहनधारक व त्यांचे जामीनदार यांना तोंडी सुचित केले असुन आज रोजी लेखी पत्र दिले आहे.) (कर्ज अर्जातील पत्तावर) सबब नोटीस प्राप्त न झाल्यास सदर जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, कर्जदार शेख जावेद सदरोदीन यांनी आपले वाहन आज पासुन सात दिवसांचे आज थकीत रक्कम भरुन घेऊन जावे (दिनांक ०१.०३.२०२६ पुर्वी) अन्यथा त्या सदर वाहनाचे विक्री संदर्भात निर्णय घेऊन तज्ञ मुल्यांककोचे मुल्यांकना नुसार लिलाव अथवा टेंडर प्रक्रियेद्वारे वाहन विक्री करण्यात येईल याबाबत सर्व हक्क बँकेचे संबंधीत अधिकृत वसुली अधिकारी स्वतःकडे राखुन ठेवीत आहेत.

-स्वाक्षरीत-
वसुली अधिकारी
मो.क्र.७६६६५७७९००



# नवोदय विद्यालयाच्या प्राचार्याची बदली रद्द करण्याची मागणी

## विद्यार्थ्यांनी सुरू केले अन्नत्याग आंदोलन, प्रशासनाचे पथक दाखल




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ फेब्रुवारी**

वसमत येथील जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य सुरेश गवळी यांची तडकाफडकी बदली केलेली बदली रद्द करावी या मागणीसाठी इयत्ता सहावी ते बारावीच्या सुमारे ४७५ विद्यार्थ्यांनी रविवारपासून अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. विद्यार्थ्यांनी स्वत:ला वसतीगृहाच्या आवारात कोंडून घेतले असून जोपर्यंत प्राचार्यांची बदली रद्द होत नाही तोपर्यंत पाणीही पिणार नसल्याची भूमिका घेतली आहे. या घटनेचे गांभीर्य ओळखून जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी तातडीने प्रशासकीय पथक घटनास्थळी रवाना केले आहे.

वसमत येथे जवाहर नवोदय विद्यालय असून या ठिकाणी सहावी ते बारावीपर्यंतचे सुमारे ४७५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यालयात प्राचार्य सुरेश गवळी यांची अचानक बदली करण्यात आली. केवळ अठरा महिन्याच्या कालावधीतच त्यांची बदली झाल्यामुळे विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. केवळ दोन ते तीन विद्यार्थ्यांच्या पालकांनी केलेल्या तक्रारीवरून प्राचार्य गवळी यांची बदली झाल्याचा आरोप विद्यार्थी व पालकांनी केला आहे.

प्राचार्य गवळी यांची बदली रद्द करावी या मागणीसाठी नवोदय विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शनिवारी दि २१ फेब्रुवारी रोजी विद्यालयासमोर ठाण मांडून घोषणाबाजी केली होती. त्यानंतर आजपासून अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. सकाळपासूनच विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले आहे. नवोदय विद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांनी गेट बंद करून स्वत:ला कोंडून घेतले आहे. विद्यार्थ्यांनी सकाळचा नाश्ताही केला नाही. जोपर्यंत प्राचार्यांची बदली रद्द होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच राहणार अशी ठाम भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली आहे.

घटनेची माहीती मिळताच जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी तातडीने पावले उचलत घटनास्थळी औंढा नागनाथचे तहसीलदार हरिश गाडे, वसमतचे नायब तहसीलदार विनोद डोणगावकर यांचे पथक विद्यालयात पाठवले असून विद्यार्थी, पालक व प्रशासनाशी चर्चा करून समजून काढण्याचा प्रयत्न करीत आहेत.

# अनूसूचीत जाती प्रवर्गासाठी २६ फेब्रुवारीला उद्योजकता मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ फेब्रुवारी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे पुरस्कृत व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने हिंगोली जिल्ह्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील युवक, युवती व महिलांसाठी संगणक आधारित डीटीपी एक महिन्याच्या कालावधीचा मोफत अनिवासी तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम दि. २७ फेब्रुवारी ते २७ मार्च २०२६ या कालावधीत हिंगोली येथे आयोजित करण्यात आला आहे.

या ३० दिवशीय प्रशिक्षणासाठी उमेदवारांची निवड करण्याकरिता एक दिवशीय उद्योजकता विकास परिचय मेळावा व मुलाखतीचे आयोजन दि. २६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता रेनबो कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट, आदर्श कॉलेजजवळ, पाण्याच्या टाकीजवळ, हिलटॉप कॉलनी, हिंगोली येथे करण्यात आले आहे.

प्रशिक्षणामध्ये कॉम्प्युटर फंडामेंटल्स अँड ऑपरेटिंग सिस्टीम, अडोबी फोटोशॉपची ओळख, ग्राफिक डिझाईन मूलतत्त्वे, बॅनर व फ्लेक्स डिझाईन, लोगो डिझाईन, ब्रँडिंग संकल्पना, व्हिजिटिंग कार्ड, पॅम्प्लेट/फ्लायर डिझाईन आदी विषयांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास, उद्योग उभारणी प्रक्रिया, उद्योग निवड, बाजारपेठ सर्वेक्षण, प्रकल्प अहवाल तयार करणे, निधी उभारणी, आवश्यक परवाने इत्यादी बाबींवर सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या प्रशिक्षणासाठी पात्रता किमान इयत्ता १० वी उत्तीर्ण असून उमेदवार हिंगोली जिल्ह्याचा रहिवासी असावा. वयोमर्यादा १८ ते ४५ वर्षे असून उमेदवार अनुसूचित जाती प्रवर्गातील असणे आवश्यक आहे. प्रशिक्षणासाठी निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे करण्यात येणार आहे.

इच्छुक उमेदवारांनी जातीचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, आधार कार्ड, शाळा सोडल्याचा दाखला, गुणपत्रिका, पॅन कार्डच्या दोन प्रती व दोन पासपोर्ट आकाराचे छायाचित्रांसह महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, जिल्हा उद्योग केंद्र, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे कागदपत्रे सादर करावीत, असे आवाहन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे विभागीय अधिकारी सुदाम थोटे, बार्टीचे प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ गोवंदे व प्रकल्प अधिकारी सुधीर आठवले (मो. ९१६८६६७१३३) यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी कार्यक्रम आयोजक किसन धाबे (मो. ९३७०६३१४६१) यांच्याशी संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# पुसेगाव येथे केवलज्ञान कल्याणक सोहळा उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ फेब्रुवारी**



सेनगाव तालुक्यातील पुसेगाव येथे सुरु असलेल्या आंतरराष्ट्रीय पंचकल्याणक महोत्सवानिमित्त आयोजित केवलज्ञान कल्याणक सोहळा भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. दिवसभर विविध धार्मिक विधी, प्रवचन व सांस्कृतिक कार्यक्रमांनी परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते.

प्रातः मंगळाष्टक, नित्य अभिषेक, शांतिधारा व तप कल्याणक पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर पूज्य आचार्य श्रीं चे मार्गदर्शन, भगवान आदिनाथ महामुनी यांच्या आहार चर्या दृश्याचे सादरीकरण तसेच वेदी शुद्धी विधी पार पडला. दुपारच्या सत्रात होम-हवन, ४८ संस्कार, अंजन्यास, मंत्रन्यास आदी विधी संपन्न झाले. समवशरण रचना, दिव्य ध्वनी व प्रश्नोत्तरी कार्यक्रमाने उपस्थित भाविकांना आध्यात्मिक अनुभूती दिली. सायंकाळी गुरु भक्ती, आरती व सांस्कृतिक कार्यक्रमाने सोहळ्याची सांगता झाली.

दरम्यान शनिवारी सकाळी शिवसेनेचे आमदार संतोष बांगर, माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर युवा नेते राम कदम तसेच शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाला भेट देऊन पूज्य आचार्यांचे दर्शन घेतले. त्यांनी महोत्सवाच्या उत्कृष्ट नियोजनाचे कौतुक करत आयोजकांचे अभिनंदन केले. या सोहळ्यामुळे पुसेगाव परिसरात भक्ती व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# पत्रकार राकेश भट्ट बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्काराने सन्मानीत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ फेब्रुवारी**

आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना महाराष्ट्र शासनाकडून राज्यस्तरावर आदरणीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार दिला जातो. या संदर्भात २०२४ सालचे पुरस्कार जाहीर करण्यात आले असून त्यात दैनिक भास्करचे जिल्हा वार्ताहर राकेश भट्ट यांना महाराष्ट्र शासनातर्फे आरोग्य क्षेत्रात दिला जाणारा राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार रविवार, २२ फेब्रुवारी रोजी मुंबईतील स्व.यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित कार्यक्रमात राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर आणि सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना आदरणीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार दिला जातो. आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल पुरस्कार म्हणून एक लाख रुपये रोख, पदक आणि प्रमाणपत्र देण्यात आले.

## संक्षिप्त वृत्त

### अवैध तलवार बाळगणाऱ्यास केले जेरबंद



हिंगोली-जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी हिंगोली जिल्ह्यातील अवैधपणे हत्यार बाळगणाऱ्याची सोशल मीडियावरून तसेच गोपनीय माहिती काढून कठोर कार्यवाही करण्यासंदर्भाने सूचना स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस स्टेशनला दिल्या आहेत त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेने अवैध हत्यार बाळगणाऱ्या विरोधात विशेष मोहीम सुरू केली आहे. दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन वसमत शहर हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय माहिती मिळाली की इसम नामे मंगेश सुरेश दगडे याने स्वतःच्या ताब्यात अवैधरित्या तलवार बाळगून दहशत करीत आहे अशा प्रकारची माहिती मिळाल्या संदर्भाने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संशयित इसमास तात्काळ ताब्यात घेऊन त्याची अंग झडती घेतली असता त्याच्याजवळ एक धारदार पात्याची तलवार मिळून आली त्या अनुषंगाने आरोपी नामे मंगेश सुरेश झगडे वय २२ वर्षे राहणार सत्याग्रह चौक दर्गा पेठ वसमत यास ताब्यात घेऊन तलवार जप्त करून पोलीस स्टेशन वसमत शहर येथे भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक निलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक कमलेश मीना, पोलीस निरीक्षक मोहन भोसले स्थानिक गुन्हे शाखा हिंगोली, यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे, पोलीस अंमलदार भुजंग कोकरे, आकाश टापरे, नरेंद्र साळवे, साईनाथ कंठे, ज्ञानेश्वर गोरे, शिवाजी जाल्मिरे यांच्या पथकाने केली आहे.



हिंगोली-संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर पोलिस भरती प्रक्रिया सुरू असून उमेदवारांची शारीरिक चाचणी करतांना अधिकारी कर्मचारी दिसत आहेत. छाया- विजय गुंडेकर

# अवैध वाळूची वाहतुक करणारी दोन वाहने पोलिसांनी पकडले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ फेब्रुवारी**




अप्पर पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांचय पथकाला मिळालेल्या गोपनीय माहीतीवरून पेट्रोलिंग करतांना औंढा नागनाथ येथील मार्केट कमिटीच्या मोकळ्या जागेत अवैधरित्या वाळू भरून एक टिप्पर जात असतांना पथकाने ताब्यात घेतले आहे तर दुसरी घटना हिंगोली शहरानजीक गंगानगर भागात अवैध वाळू वाहतुक करणारे टिप्पर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. याप्रकरणी संबंधित पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच २५ लाख २२ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांनी जिल्ह्यातील अवैध वाळू वाहतुकीबाबत कठोर कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या संदर्भाने जिल्ह्यात अवैध वाळू वाहतुकीवर दररोज कार्यवाही चालू आहे. त्या अनुषंगाने कमलेश मीना अपर पोलीस अधीक्षक यांच्या नियंत्रणाखालील पथकाने दि २२ फेब्रुवारी २०२६ रोजी मध्यरात्री हिंगोली जिल्हा हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय माहिती मिळाली की, औंढा शहरांमध्ये मार्केट कमिटीच्या मोकळ्या जागेत एक अवैधरित्या रेती भरून टिप्पर रेतीची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने थांबले आहे अशी माहिती मिळताच पोलीस पथकाने छापा मारला असता टिप्पर चालक नामे गजानन विठ्ठल चव्हाण वय ३५ वर्षे राहणार रुपुर तांडा हा पिवळ्या रंगाच्या विना नंबरच्या टिप्पर मध्ये अवैरित्या दोन ब्रास वाळू भरून चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने मिळून आल्यासंदर्भाने पोलीस पथकाने टिप्पर व आरोपीस ताब्यात घेऊन पोलीस स्टेशन औंढा नागनाथ येथे गुन्हा दाखल केला आहे. सदरची कार्यवाही नीलाभ रोहन, पोलीस अधीक्षक हिंगोली. श्री कमलेश मीना अपर पोलीस अधीक्षक हिंगोली यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अमलदार संदीप पवार, गजानन राठोड, सुमित टाले, नरवाडे, विनोद कुटे यांच्या पथकाने केली आहे.

दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन हिंगोली ग्रामीण हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन हिंगोली ग्रामीण हद्दीत खटकाळी बायपास ते गंगानगर परिसरात एक पिवळे केबिन असलेले टिप्पर अवैधरित्या रेतीची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक करीत आहे अशी माहिती स्थागुशा पथकास मिळाल्यास संदर्भाने पोउपनि माधव जीवारे यांच्या पथकाने सदर टिप्पर पकडून रॉयल्टी बाबत विचारपूस केली असता सदर टिप्पर चालक नावे वैभव श्रीराम सांगळे वय २३ राहणार माथा तालुका औंढा नागनाथ असे असल्याचे सांगून सदर वाळू औंढा नागनाथ हद्दीतून आणल्याचे सांगितल्यावरून टिप्पर चालक व टिपर याच ताब्यात घेऊन १० लाख १२,५०० चा मुद्देमाल जप्त करून पोलीस स्टेशन हिंगोली ग्रामीण येथे गुन्हा दाखल केला आहे.सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक नीलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक श्री कमलेश मीना. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री माधव जीवारे, अमंलदार, सुभाष घुगे, संदीप जाधव, किशोर सावंत यांच्या पथकाने केली आहे.

# शिवसेना गटनेते श्रीराम बांगर यांचेहस्ते एनटीसीमध्ये रस्त्याचे कामाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ फेब्रुवारी**



नगर परिषद हिंगोली अंतर्गत एन.टी.सी. हिंगोळी तापडिया इस्टेट प्रभाग क्र. १५ मध्ये निलावार ते सुभाष तापडिया यांचे घर, भरत जगताप ते सुभाष देवकर यांचे घर, चौधरीते निश्चल यंबल यांचे घरापर्यंत सी.सी. रस्ता बांधकामाचे उद्घाटन सुभारंभ शिवसेना गटनेते श्रीराम बांगर, उपाध्यक्ष माबुद बागवान, नगरसेवक रानाकर बांगर, नगरसेवक सुमित कांबळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले यावेळी याप्रसंगी गोविंदप्रसाद चौधरी, विनोद मुथा, केशव दुबे, निश्चल यंबल, दिनकर गंगावने, सजय भुरके, बबन रिठ्ठे, राजु साबु, डॉ. भाकरे, नाना, बांगर, नितीन घुगे, भरत जगताप, विशाल बडजाते, संतोष वेरूळकर, संदिप बांगर, गुत्तेदार आर. बांगर, उदय सोविएतकर, चक्रवार, धनंजय टेहरे, देवकर संयम यरमळ, गणेश वाबळे, प्रमोद परतवार, प्रशांत गुंडेवार, अॅड. नायक, अजिंक्य मुक्कीरवार, सचिन करेवार, सुनय कंदी, राजेश भिळवंडे, पुरुषोत्तम धर्माधिकारी, अमोल तापडिया, शिवाजी पाल नितीन घुगे, सुनिल चौधरी, घुगे, अविन महाजन, डिपक लोंढे, स्वप्नील अपया, पिंटू चौधरी आदीसह रहीवाशी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोलिसांनी मागविली अर्बन महिला क्रेडीट सोसायटीच्या ठेवीदारांकडून कागदपत्रे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ फेब्रुवारी**

शहरातील नवा मोंढा भागातील अर्बन महिला क्रेडीट सोसायटीच्या फसवणूक प्रकरणात पोलिस विभागाने ठेवीदारांकडून आवश्यक कागदपत्रे मागविली आहेत. खातेदारांना आवश्यक कागदपत्रे आर्थिक गुन्हे शाखेकडे सादर करण्याचे आवाहन पोलिस अधीक्षक निलाभ रोहन यांनी केले आहे. त्यामुळे अनेक ठेवीदारांच्या ठेवी परत मिळण्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार शहरातील अर्बन महिला क्रेडीट सोसायटीच्या संचालक मंडळ व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी ग्राहकांना जादा व्याजदराचे आमिष दाखवत ठेवी ठेवून घेतल्या होत्या. मात्र ठेवीची मुदत संपूनही ठेवीदारांना ठेवी देण्यात आल्या नाही. याप्रकरणी काही ग्राहकांनी उपनिबंधक कार्यालयात तक्रारी दाखल केल्या होत्या. त्यानंतर लेखापरीक्षण करण्यात आले. त्यामध्ये संचालक मंडळाने कट करून ठेवीदार ग्राहकांची फसवणूक केल्याची तक्रार करण्यात आली होती. यावरून हिंगोली शहर पोलिस ठाण्यात संस्थेच्या संचालकांसह अधिकारी, कर्मचारी यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले होते. या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला. आर्थिक गुन्हे शाखेचे सपोनि संतोष शेकडे यांच्या पथकाने अधिक तपास केला आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर ठेवीदारांमधून एकच खळबळ उडाली होती. आता ठेवीदारांच्या ठेवी परत मिळणार की नाही याबाबत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. दररोज पैसे जमा करणाऱ्या खातेदारांनी एजंटशी संपर्क साधून पैसे परत देण्याची मागणी चालवली होती. दरम्यान, यासंदर्भात पोलिस विभागाने खातेदारांकडून माहीती मागविली आहे. यासाठी अर्ज उपलब्ध करून दिल्या जाणार असून त्याच्या सोबत ठेवीच्या पावत्या, बचत खात्याचे पासबुक, आरडी पासबुक, पिग्मी पासबुक किंवा इतर ठेवीच्या दस्ताची झेरॉक्स, आधारकार्ड, पॅनकार्ड आदी सादर करावयाचे आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# नांदेड जिल्ह्यात 'क्लास संस्कृती'चा स्फोट

## वर्षभर गैरहजर असलेले विद्यार्थी महाविद्यालयात हजर!

**गोविंद नरसीकर**
**नरसी, दि. २२ फेब्रूवारी-**

जिल्हाधिकारी राहुल कर्डीले हे दहावी-बारावी परीक्षा कॉपीमुक्त व्हावी यासाठी स्वतः परीक्षा केंद्रांवर जाऊन तळ ठोकून बसत आहेत. त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असतानाच आता एक गंभीर आणि चर्चेचा विषय पुढे आला आहे. नांदेड शहरात अकरावी-बारावीचे हजारो विद्यार्थी कॉलेजमध्ये केवळ 'नावाला' प्रवेश घेऊन वर्षभर खासगी क्लासेसमध्ये शिकत आहेत. कॉलेजमध्ये एकही दिवस उपस्थित राहत नसताना त्यांना परीक्षेला कसे बसु दिले जाते? असा संतप्त सवाल सर्वसामान्य नागरिकांमधून उपस्थित होत आहे.



**नाव कॉलेजचे; शिक्षण क्लासचे!**

नांदेड शहरात मोठ्या प्रमाणावर अकरावी-बारावीचे खासगी क्लासेस सुरू आहेत. लाखो रुपये फी भरून विद्यार्थी या क्लासेसमध्ये प्रवेश घेतात. मात्र, शासनाच्या नियमानुसार ११-१२वीसाठी नियमित उपस्थिती बंधनकारक असताना अनेक विद्यार्थी कॉलेजच्या वर्गात फिरकतही नाहीत, अशी वस्तुस्थिती आहे.

दररोज सकाळ-संध्याकाळ हजारो विद्यार्थी बॅगा खांद्यावर घेऊन क्लासेसकडे जाताना दिसतात. मग कॉलेजमध्ये हजेरी कोण लावतो? उपस्थितीचा दाखला कसा दिला जातो? या प्रश्नांची उत्तरे धूसरच आहेत.

**ग्रामीण भागावर अन्याय?**

एकीकडे इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत विद्यार्थीसंख्या कमी असल्यास शाळांच्या तुकड्या कमी केल्या जातात, शिक्षकांची कपात होते. ग्रामीण भागातील शाळांना याचा मोठा फटका बसतो.

तर दुसरीकडे ११-१२वीत नावापुरते प्रवेश घेऊन विद्यार्थी शहरातील क्लासेसमध्ये शिकत असतील, तर ही दुहेरी नीती नाही का? ग्रामीण विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान आणि आर्थिक ओझे वाढत असल्याची भावना पालक व्यक्त करत आहेत.

**उपस्थितीचा नियम फक्त कागदावर?**

शासनाच्या नियमानुसार ११-१२वीच्या विद्यार्थ्यांची किमान ठरावीक टक्केवारी उपस्थिती आवश्यक असते. मग कॉलेजमध्ये न जाता वर्षभर क्लासेसमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षा कशा देता येतात?

कॉलेज प्रशासन आणि संबंधित शिक्षण विभागाकडून या बाबींकडे दुर्लक्ष होते का? की जाणूनबुजून डोळेझाक केली जाते? असा सवाल आता नागरिकांमध्ये चर्चिला जात आहे.

**छत्रपती संभाजीनगरचे विद्यार्थी नांदेडात**

ग्रामीण भागातील महाविद्यालयात केवळ नांदेड जिल्ह्यातील नव्हे तर छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी या ठिकाणचे रहीवाशी असलेले विद्यार्थी देखील परीक्षा देत असल्याचे निदर्शनास येत आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्याची मागणी**

कॉपीमुक्त परीक्षा हा स्तुत्य उपक्रम असला तरी, शिक्षण व्यवस्थेतील ही 'दुहेरी पद्धत' थांबवण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी होत आहे. नांदेड शहरातील खासगी क्लासेसचे नियमीत ऑडिट करणे, ११-१२वीच्या कॉलेजांची प्रत्यक्ष उपस्थिती तपासणे, बायोमेट्रिक हजेरी प्रणाली लागू करणे, अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करणे या उपाययोजना तातडीने राबविण्याची आवश्यकता असल्याचे शिक्षणप्रेमी सांगत आहेत.

**क्लास संस्कृती' की शिक्षणाचा व्यवसाय?**

शिक्षण हा व्यवसाय बनत चालल्याची खंतही व्यक्त होत आहे. लाखो रुपयांची फी भरून क्लासेसमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना कॉलेज केवळ 'हजेरीचा कागद' ठरत असेल, तर शासनाच्या शिक्षण धोरणावरच प्रश्नचिन्ह उभे राहते.


कॉपीमुक्त परीक्षा राबवणाऱ्या प्रशासनाने आता 'हजेरीमुक्त शिक्षणा'कडेही लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नांदेड जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित हा प्रश्न आता केवळ चर्चा न राहता ठोस कारवाईची मागणी बनला आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डीले आणि शिक्षण विभागाने याबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांतून जोर धरत आहे.

# सगरोळीच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूलला अ+ दर्जाचा बहुमान

**तभा वृतसेवा**
**सगरोळी, दि. २२ फेब्रूवारी-**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या School Quality ssessment and ssurance Framework (SQF) अंतर्गत चालू शैक्षणिक वर्षात सगरोळी (ता. बिलोली) येथील संस्कृती संवर्धन मंडळ संस्थेच्या श्री. छत्रपती शिवाजी हायस्कूल व ज्यु. कॉलेज प्रशालेचे सर्वंकष मूल्यमापन करण्यात आले. या मूल्यमापनात शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, अध्यापन कौशल्य, विद्यार्थ्यांची प्रगती, सहशालेय उपक्रम, पायाभूत सुविधा, शाळा व्यवस्थापन आणि समुदाय सहभाग अशा एकूण १२८ मानकांवर काटेकोर व पारदर्शक तपासणी करण्यात आली. त्यामध्ये प्रशालेने ४८८ पैकी ४८२ गुण मिळवत मानाचा अ+ दर्जा प्राप्त केला. गुणवत्ता क्षेत्रात हे यश अभूतपूर्व असून, राज्याच्या शैक्षणिक नकाशावर सगरोळीने आपली उज्ज्वल छाप उमटवली आहे.

विशेष म्हणजे, महाराष्ट्रातील तब्बल १,०२,६६५ शाळांपैकी केवळ ४२९ शाळांना अ+ श्रेणी बहाल करण्यात आली असून, नांदेड जिल्ह्यातील हायस्कूल विभागातून एकमेव निवड होणे ही सगरोळी व परिसरासाठी अत्यंत अभिमानाची आणि ऐतिहासिक कामगिरी ठरली आहे. लवकरच राष्ट्रीय स्तरावरील (दिल्ली) मूल्यांकन समिती शाळेला भेट देऊन अंतिम मूल्यांकन करणार असून, सगरोळीची शैक्षणिक गुणवत्ता आता राष्ट्रीय पातळीवर झळकणार आहे.



महाराष्ट्र शासन यांच्या 'माझी शाळा सुंदर शाळा' स्पर्धेत सलग तीन वर्षे विभाग स्तरावर प्रथम क्रमांक पटकावलेल्या श्री. छत्रपती शिवाजी हायस्कूलमध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास पूरक असे 'एक विद्यार्थी एक छंद एक कौशल्य' धोरण मागील पाच वर्षांपासून प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या उपक्रमातून विद्यार्थी कला, क्रीडा व शैक्षणिक स्पर्धांमध्ये राष्ट्रीय स्तरावर उज्वल यश संपादन करत आहेत. मुलामुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहे, तसेच सुमारे १५०० विद्यार्थी व अध्यापक संकुलात वास्तव्यास असल्यामुळे प्रशालेत नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी सदैव अनुकूल वातावरण उपलब्ध असते. या उल्लेखनीय यशामागे विद्यार्थी, पालक, शिक्षकवृंद, माजी विद्यार्थी आणि संस्थेचे व्यवस्थापन यांच्या एकत्रित, शिस्तबद्ध आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचा मोलाचा वाटा असल्याचे शिक्षकांनी सांगितले.

हे यश केवळ एका व्यक्तीचे नसून विद्यार्थी, शिक्षकवृंद, माजी विद्यार्थी, पालक तसेच संस्थेच्या व्यवस्थापनाने केलेल्या सातत्यपूर्ण, शिस्तबद्ध आणि सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे.

## अभय महाजन यांच्या पुढाकारातून गरजू ३० दिवस इफ्तार साहित्य वाटप

**किनवट**-पवित्र रमजान महिन्यानिमित्त शहरात सामाजिक ऐक्य व मानवतेचा संदेश देणारा उपक्रम राबविण्यात येत आहे. माजी उपनगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक अभय महाजन व त्यांच्या मित्रपरिवाराच्या पुढाकारातून गरजू मुस्लिम बांधवांना सलग ३० दिवस इफ्तारी साहित्याचे वाटप करण्यात येत आहे. रमजान हा संयम, त्याग आणि सेवाभावाचा महिना मानला जातो. या पार्श्वभूमीवर उपवास सोडताना आवश्यक असणारे खजूर, फळे व इतर इफ्तारी साहित्य उपलब्ध व्हावे या हेतूने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या माध्यमातून समाजातील गरजू कुटुंबांना मदतीचा हात दिला जात असून स्थानिक नागरिकांकडून उपक्रमाचे कौतुक व्यक्त केले जात आहे. समाजातील सर्व घटकांनी एकोप्याने एकमेकांना सहकार्य करावे हा संदेश या उपक्रमातून दिला जात असून गरजू नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. इफ्तारी साहित्याबाबत अधिक माहितीसाठी किंवा लाभ घेण्यासाठी इच्छुकांनी खालील संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## किनवट पोलीस ठाणे हद्दीत 'मास रेड'; मटका व गावठी दारू प्रकरणी चार गुन्हे

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २२ फेब्रूवारी-**

किनवट पोलीस ठाणे हद्दीत राबविण्यात आलेल्या 'मास रेड' मोहिमेत मटका जुगार व गावठी दारू विक्रीविरोधात मोठी कारवाई करण्यात आली. शहर व परिसरातील विविध ठिकाणी धाड टाकून मटका अड्ड्यांवर दोन तसेच गावठी दारू विक्रेत्यांवर दोन अशा एकूण चार गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या कारवाईत मटका जुगार प्रकरणी विठ्ठल खंडू गीमेकर (वय ५२, रा. घोटी, ता. किनवट, जि. नांदेड) याच्या ताब्यातून ८५० रुपये रोख रक्कम, मटक्याचे आकडे लिहिलेल्या चिठ्ठ्या, दोन कागदी चिठ्ठ्या व एक बॉलपेन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी पोलीस कर्मचारी सदाशिव माणिकराव अनंतवार यांनी फिर्याद दिली आहे.



दुसऱ्या कारवाईत देवराव सोनबा बोरकर (वय ५८, रा. कोठारी, ता. किनवट, जि. नांदेड) याच्याकडून १,०५० रुपये रोख रक्कम तसेच मटक्याच्या चिठ्ठ्या व संबंधित साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणी पोलीस कर्मचारी बाळू भुजंगराव कुडमेते यांनी तक्रार दाखल केली आहे.

दरम्यान, गावठी दारू प्रकरणी इलवंत महादू मुरमुरे (वय ५३, रा. बोधडी, ता. किनवट) याच्या ताब्यातून प्रत्येकी २० लिटर क्षमतेच्या दोन प्लास्टिक कॅनमध्ये एकूण ४० लिटर हातभट्टीची दारू (अंदाजे किंमत ४ हजार रुपये) जप्त करण्यात आली. बेकायदेशीररित्या विक्रीसाठी माल साठविल्याप्रकरणी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील सर्व प्रकरणांमध्ये आर्थिक फायद्यासाठी 'टाईम ओपन' नावाचा मटका जुगार चालवित असल्याचे निष्पन्न झाले आहे. मा. पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली असून पुढील तपास हवालदार सीरमनवार व हवालदार वाघमारे करीत आहेत.

दरम्यान, अवैध धंद्यांविरुद्ध कारवाईची मोहीम पुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

## उमेद अभियानाचे तालुका व्यवस्थापक विठ्ठल अन्नपूर्णे यांचा निरोप समारंभ

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २२ फेब्रूवारी-**

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान तालुका व्यवस्थापक विठ्ठल अन्नपूर्णे यांचा तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष मुदखेड यांच्यातर्फे डॉ.शंकरराव चव्हाण सभाग्रहात दि. २० फेब्रुवारी रोजी निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करून त्यांचा सपत्नीक जाहीर सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी तालुक्यातील सर्व ग्राम सखी तालुका अभियान व्यवस्थापक गंगाधर राऊत सर, प्रभाग समन्वयक तथा तालुका व्यवस्थापक राधाताई मिरदुडे मॅडम प्रभाग समन्वयक वैशाली कोतवाले मॅडम उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका अभियान व्यवस्थापक राऊत सर होते. कार्यक्रमाचे सुरेख असे सूत्रसंचालन प्रेमिला भिसे यांनी केले तर आभार प्रदर्शन शितल पुयड यांनी केले.



## मुदखेड तालुका तलाठी संघटनेच्या अध्यक्षपदी विश्वनाथ बोधमवाड

**मुदखेड** -महाराष्ट्र राज्य ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) संघटना, तालुका मुदखेडची नूतन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यामध्ये तालुकाध्यक्षपदी विश्वनाथ बोधमवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. बाबुराव मुळेकर यांच्या अध्यक्षतेखाली मुदखेड येथे पार पडलेल्या बैठकीत ही निवड प्रक्रिया राबवण्यात आली. नूतन कार्यकारिणी मध्ये मुदखेड तालुका अध्यक्ष विश्वनाथ बोधमवाड, उपाध्यक्ष शंकर वच्छेवार, सचिव गोपाल माने, कोषाध्यक्ष राजू चव्हाण यांची निवड करण्यात आली. या प्रसंगी मंडळ अधिकारी रूपाली जडे, शितल तरटे आणि अंजली बार्शीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच या निवडीचे स्वागत करत ग्राम महसूल अधिकारी मनोज वाघमारे, शेषराव कोटुरवार, गंगाधर मोरे, विकास गालंडे, प्रसाद पांडे, युसुफ शेख, सविता कल्याणकर आणि रंजना दमकोंडवार यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.



## ग्रामीण प्रशासनात सातत्य राखण्यासाठी शासनाची मोठी पावले

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २२ फेब्रूवारी-**

राज्यातील मुदत संपलेल्या तसेच लवकरच मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने जाहीर केला आहे. महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग यांनी २० फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार, पुढील निवडणुका होईपर्यंत संबंधित ग्रामपंचायतींचा कारभार प्रशासकांकडे सोपविण्यात येणार आहे. यापूर्वी २३ जानेवारी २०२६ रोजी निर्गमित करण्यात आलेले पत्र रद्द करून नव्या अधिसूचनेनुसार कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

ही अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्राच्या असाधारण भाग चार-ब, क्रमांक ८१ मध्ये प्रसिद्ध करण्यात आली असून तिच्या मराठी व इंग्रजी प्रती सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठविण्यात आल्या आहेत. संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तातडीने आवश्यक ती कार्यवाही करावी, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

राज्यातील अनेक ग्रामपंचायतींची पाच वर्षांची मुदत पूर्ण होत असल्याने निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत प्रशासनात सातत्य राखणे आवश्यक ठरत आहे. विकासकामे, शासकीय योजना आणि निधी वितरण यामध्ये कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठीच प्रशासक नेमण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग निवडणुकांच्या तयारीला लागला असून लवकरच निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. तोपर्यंत ग्रामपातळीवरील दैनंदिन प्रशासन, आर्थिक व्यवहार आणि विकासकामांची जबाबदारी प्रशासकांकडे राहणार आहे.

प्रशासकांना नियमित कामकाजासोबतच अत्यावश्यक विकासकामांना मंजुरी देण्याचे अधिकार राहतील. मात्र मोठे धोरणात्मक निर्णय घेण्यास मर्यादा असू शकतात, अशी माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. हा निर्णय महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ अंतर्गत घेण्यात आला असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, केंद्र व राज्य शासनाच्या विविध ग्रामीण योजनांवर कोणताही परिणाम होणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना तसेच प्रधानमंत्री आवास योजना यांसारख्या महत्त्वाच्या योजनांची अंमलबजावणी पूर्ववत सुरू राहणार आहे. निधी वितरण आणि प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासकांना आवश्यक अधिकार देण्यात येणार आहेत.

लोकप्रतिनिधींच्या अनुपस्थितीत पारदर्शकता व लोकसंपर्क राखण्याची जबाबदारी प्रशासनावर अधिक राहणार आहे. ग्रामसभेचे महत्त्व कायम ठेवत नागरिकांच्या तक्रारी व सूचनांचा विचार केला जाईल, असेही सांगण्यात आले आहे.

काही माजी लोकप्रतिनिधींनी निवडणुका लवकर घेण्यात याव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली असून ग्रामस्थांनी विकासकामे रखडू नयेत, अशी भूमिका मांडली आहे. ग्रामीण भागातील प्रशासन सुरळीत सुरू ठेवण्यासाठी शासनाचा हा निर्णय महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

## नांदेड- धानोडा महामार्ग खड्ड्यांच्या विळख्यात

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २२ फेब्रूवारी-**

नांदेड-भोकर-हिमायतनगर-किनवट-माहूर- धनोडा या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ (ए) ची अवस्था गंभीर बनली असून धानोरा घाट ते सावरीदरम्यान रस्ता खड्ड्यांनी विदीर्ण झाला आहे. जीवघेण्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांची अक्षरशः कसरत सुरू असून अपघातांचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे.

किनवट ते नांदेड या सुमारे १५० किमी प्रवासात प्रवाशांना प्रचंड हाल सहन करावे लागत आहेत. वनजमिनीतील प्रलंबित काँक्रिटीकरणामुळे करण्यात आलेले तात्पुरते डांबरीकरण पूर्णपणे उखडले असून गोकुंदा परिसरात रस्त्याची परिस्थिती बिकट झाली आहे. घोटीकमठाला दरम्यान नुकत्याच घडलेल्या अपघातात दोन तरुण जखमी झाल्याने धोक्याची तीव्रता पुन्हा अधोरेखित झाली आहे. खड्ड्यांमुळे वाहनांचे नुकसान, उडणाऱ्या धुळीमुळे श्वसनाचे त्रास आणि सततच्या धक्क्यांमुळे आरोग्याच्या समस्या वाढत आहेत. आपत्कालीन रुग्ण व गर्भवती महिलांसाठी हा मार्ग अधिकच धोकादायक ठरत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना आहे.



राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांच्या कथित दुर्लक्षामुळे गोकुंदाकिनवट मार्गाची दुरवस्था गेली आठ वर्षे कायम असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. धनोडाचिखली मार्गाचे काम अद्याप अपूर्ण असून उड्डाणपूलाच्या कारणास्तव सेंट मेरी स्कूल ते गोकुंदा पेट्रोलपंपदरम्यानचा रस्ता रखडलेलाच आहे. परिणामी या भागात खड्डे आणि धुळीचे साम्राज्य पसरले आहे.जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या किनवट भेटीदरम्यान भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष संदीप केंद्रे, गोकुंदा उपसरपंच सरू शेख आणि माजी जिल्हा परिषद सदस्य प्रवीण मॅकलवार यांनी निवेदन देत रस्ता तातडीने दुरुस्त करण्याची मागणी केली.

## वाघीत रोडे विद्यालयात शिवजयंतीनिमित्त आरोग्य शिबिर

**आदमपूर** -शिवजयंतीनिमित्त मल्हार सेवाभावी संस्था संचलित वाघी,ता.नांदेड येथील माजी सैनिक उत्तमराव रोडे उच्च माध्यमिक विद्यालयात सर्वरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात वाघी परिसरातील गरजू नागरिकांच्या विविध आरोग्यदायी आजारांबद्दल वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञांनी योग्य सल्ला दिला.दरवर्षी असे शिबिर भरविण्यात यावे,अशा भावना सहभागी नागरिकांकडून व्यक्त करण्यात आल्या. यावेळी कार्यक्रम अध्यक्षा म्हणून संस्थाध्यक्षा सौ.वैशालीताई नांदलगांवकर तर प्रमुख पाहुणे वाघी ग्रामचे सरपंच गणपत राठोड,चंद्रकांत भोसले, डॉ.उत्कर्ष पांचाळ,डॉ.उद्धव पिसाळ, डॉ.नितीन कपाळे, डॉ.प्रणव मोरलवार,डॉ.एस.कोकणे,डॉ.अर्जुन शेळके,डॉ.लाठकर, डॉ.तुप्पेकर हे होते. संस्थेचे प्राचार्य शिरगिरे बि.एस., प्रा. गच्चे सर, प्रा. बालाजी कोकणे, ए. एन. खान व नागरिक उपस्थित होते. संस्था सचिव चंद्रकांत रोडे व प्राचार्य शिरगिरे बि.एस.पयांनी सर्वांचे आभार मानले.

## छत्रपती शिवाजी नगर येथील हनुमान मंदिरात कलशारोहण सोहळा

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. २२ फेब्रूवारी-**

शहरातील रेल्वे स्टेशन जवळील छत्रपती शिवाजीनगर येथील हनुमान मंदिराचा कळशारोहण सोहळा विविध धार्मिक कार्यक्रमाने मोठ्या आनंदात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी प्रमुख उपस्थिती माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर, सूर्यवंशी सर यांची होती. या परिसरातील नागरिकांनी कलशारोहणाची भव्य मिरवणूक काढून मंदिराचा कलशारोहण व ध्वजारोहण महंत आनंद भारती महाराज यांच्या शुभहस्ते सकाळी अकरा वाजता करण्यात आला. त्या नंतर ह.भ.प. गजानन महाराज तामसेकर यांचा कीर्तन सोहळ्या संपन्न झाला.



गेल्या अनेक दिवसांपासून पवनसुत हनुमान मंदिर उभारण्याची संकल्पना परिसरातील मंडळींनी व्यक्त केली होती. त्या हनुमान मंदिराच्या कलशारोहणाचा कार्यक्रम आज दिनांक २२ फेब्रुवारी रोजी मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न झाला.यावेळी परमेश्वर मंदिर कमिटीचे उपाध्यक्ष महावीरचंद श्रीश्रीमाळ, अनंत देवकते विलास वानखेडे सुभाष बल्पेलवार, राम सूर्यवंशी,उदय देशपांडे, सदाशिव सातव रविराज देवसरकर, सावंत सर, प्रल्हाद जाधव,कमलाकर कमठे,अरविंद जाधव, संतोष जंगम,शेषराव मिराशे, पांडुरंग भोयर, रामदास कुंडलकर,सतीश तडकुले,बाबुराव सुरमवाड, सुनील कंठाळे, यासह अनेक भाविक भक्त व महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रायगडावरून राजगृहाकडे या पुस्तकास राज्य शासनाचा पुरस्कार जाहीर

**नवीन नांदेड** -महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळाचा स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजनेअंतर्गत सन २०२४ चे राज्य पुरस्कार दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनाकडून जाहीर करण्यात आलेल्या सन २०२४ राज्य वाङ्मय पुरस्कारांमध्ये प्रौढ विभागातील नाटक/ एकांकिका या वाङ्मय प्रकारासाठी दिला जाणारा राम गणेश गडकरी पुरस्कार गणपत गायकवाड यांच्या रायगडावरून राजगृहाकडे या पुस्तकास जाहीर झाला आहे. यामुळे नांदेड जिल्ह्याच्या शिरपेचात एका मानाचा तुरा खोवला गेला आहे. या पुरस्काराचे स्वरूप एका लाख रोख रक्कम आणि सन्मान चिन्ह असे आहे. पुरस्कार प्रदान सोहळ्याचे आयोजन शुक्रवार दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी मराठा विद्या प्रसारक समाजाचे केटीएचएम महाविद्यालय गंगापूर रोड नाशिक येथे करण्यात आले आहे. या पुरस्कारसाठी . या त्यांच्या मिळालेल्या पुरस्काराबद्दल व्हि.डी बिरादार व मित्र मंडळ आणि गावकरी यांच्यासह नातेवाईकानी अभिनंदन करून पुढील वांडांयीन लिखाणास शुभेच्छा दिल्या आहेत.



## मोक्का कायद्यातंर्गत चार जणांवर दोषारोपपत्र दाखल करण्यास मंजूरी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ फेब्रूवारी-**

जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी खंडणीच्या गुन्ह्यातील सराईत चार गुन्हेगारांवर मोक्का कायद्यातंर्गत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यास मंजुरी मिळाली असल्याची माहिती पोलीस दलाच्या वतीने देण्यात आली.

जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था व शांतता अबाधीत राखण्यासाठी गुन्हे अभिलेखावरील सक्रिय तसेच वारंवार गुन्हे करणाऱ्या सराईत आरोपींची यादी तयार करुन त्यांच्याविरुध्द प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या होत्या. यावरुन नांदेड शहरचे उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर वैंजने यांनी सराईत गुन्हेगार मनप्रितसिंघ उर्फ सोनू सुरजसिंघ औलख, करमजितसिंघ उर्फ ऋषी मनजितसिंघ भाटीया दोघे रा.गुरुव्दारा गेट नं.३, कुलविंदरसिंघ उर्फ कुणाल नानकसिंघ महाजन रा.भोईगल्ली, गणपतसिंघ गेदासिंघ मठवाले रा.गुरुव्दारा गेट नं.२ यांनी गरबा चालवायचा असेल तर दहा हजार रुपयांची खंडणी जयदुर्गा माता नवरात्र महोत्सव समितीकडे मागितली होती. यावरुन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याचप्रमाणे यांच्याविरुध्द पाच गुन्हे दाखल असल्याने पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी पोलीस उपमहानिरीक्षक यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावाला पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दि.२४ नोव्हेंबर २०२५ रोजी मंजुरी देवून या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपविभागीय अधिकारी रामेश्वर वैंजने यांच्याकडे सोपविण्याचे आदेशित केले होते. यानुसार पोलीस उपविभागीय अधिकारी रामेश्वर वैंजने यांनी गुन्ह्याचा तपास पूर्ण करुन या आरोपीविरुद्ध मोक्का कायद्यातंर्गत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याचा प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली आहे.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जीवातून जीवोत्पत्ती: फ्रान्सिस्को रेडी आणि एका भ्रमाचा अंत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ फेब्रुवारी :** दयानंद विज्ञान महाविद्यालयात १८ फेब्रुवारी २०२६ रोजी, फ्रान्सिस्को रेडी यांच्या ९० व्या जयंतीनिमित्त लुमिनार्या व्याख्यानमाला अंतर्गत विशेष वैज्ञानिक सेमिनार आयोजित करण्यात आले. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

सेमिनारची सुरुवात विभाग प्रमुख प्रा. अवंती बिडकर यांच्या हस्ते फ्रान्सिस्को रेडी यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर बी.एस्सी. जैवतंत्रज्ञान प्रथम वर्षातील विद्यार्थी रोहित साबळे यांनी रेडी यांच्या जीवनप्रवास आणि वैज्ञानिक योगदानावर सविस्तर प्रकाश टाकला. फ्रान्सिस्को रेडी यांचे वैज्ञानिक योगदान: रेडी यांनी प्रायोगिक जीवशास्त्र क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. त्यांनी सिद्ध केले की कुजलेल्या मांसावर तयार होणाऱ्या अळ्या ही बाहेरून आलेल्या माश्यांच्या अंड्यांमधून निर्माण होतात.प्रयोग: काही मांस उघड्या भांड्यात ठेवले, काही बंद भांड्यात, तर काही जाळीदार कापडाने झाकलेल्या भांड्यात ठेवले. परिणाम: केवळ उघड्या भांड्यातील मांसावर माश्या बसल्या आणि अळ्या तयार झाल्या.

या प्रयोगामुळे जीवशास्त्रात नियंत्रित प्रयोग पद्धतीची संकल्पना रुजू झाली.रेडी यांनी विषारी सापांच्या विषावरही संशोधन केले आणि परजीवीशास्त्र() क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले. रेडी यांनी पुराव्यांच्या आधारे निष्कर्ष काढण्याची पद्धत विकसित केली, ज्यामुळे त्यांना आधुनिक जीवशास्त्राचे पायाभूत शास्त्रज्ञ मानले जाते.



## विविध वृत्त...

### दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या ओद्योगिक रसायनशास्त्र विभागाची शैक्षणिक सहल

**लातूर :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील औद्योगिक रसायनशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी नॅचरल शुगर व अलाईड प्रॉडक्ट रांजणी,जिल्हा धाराशिव येथील साखर कारखाना व नॅचरल दुध डेअरीला शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून दि.१७ फेब्रुवारी २०२६ रोजी भेट दिली.महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिध्देश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही सहल आयोजित करण्यात आलेली होती. या सहलीमध्ये विद्यार्थ्यांनी ऊसापासून साखर निर्मिती व इतर घटक जसे की, विजनिर्मिती, सी. एन. जी, बायोगॅस, इथेनोल निर्मिती कश्या प्रकारे होते ते पाहिले व तसेच तेथील वेगवेगळ्या युनिटला भेट दिल्ली. त्यामध्ये बॉयलर, क्रीस्टलायझेशन प्रोसेस,इवॅपोरेशन आणि अल्कोहोल निर्मिती कशाप्रकारे होते, बायोगॅसचा वापर करुन प्रदुषणावर नियंत्रण व त्याच्या बायप्रॉडक्टचा वापर करुन गंधकयुक्त खते निर्मिती यामुळे इतर रासायनिक खताचा वापर व त्यावर होणारा पैशाचा अपवय टाळता येतो. ही खते शेतकऱ्यांना खुप कमी दरामध्ये देऊन शेतकऱ्यांचा विकास करता येऊ शकतो,त्याचेही महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. या सहलीसाठी नॅचरल शुगरचे संचालक बी.बी.ठोंबरे तसेच औद्यौगिक रसायनशास्त्र विद्यार्थी मंडळाचे सर्व पदाधिकारी, सांळुके भक्ती, सायली क्षीरसागर, अंकिता जाधव, जाधव बळवंत, काळे प्रेरणा, दाताळ साक्षी, पाटील प्रांजली, बाचपल्ले ऋशिकेष,व शिंदे मॅडम, रवी बाजपाई यांनी परिश्रम घेतले.

### तुळजाभवानी प्राथमिक विद्या मंदिरला मूल्यांकनात अ+ श्रेणी

**लातूर :** महाराष्ट्र शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे येथे राज्य शाळा मानक प्राधिकरण कक्षाची स्थापना करण्यात आली होती. राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांसाठी गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखड्याची 'एसक्यूएएएफ'ची निर्मिती करण्यात आली होती. या मूल्यांकनात राज्यातून अंबिका बहुउद्देशिय महिला मंडळ, रोहिणा द्वारा संचलित लातूरच्या तुळजाभवानी प्राथमिक विद्यामंदिरला अ+ श्रेणी प्राप्त झाली आहे. तुळजाभवानी प्राथमिक विद्यामंदिरने या मूल्यांकनात लातूर जिल्ह्यात पहिला मान मिळविला आहे. २०२४-२५ मध्ये राज्यातील १०२६७५ शाळांनी स्वयंमूल्यांकन पूर्ण केले. यानुसार राज्य शैक्षणिक मूल्यांकन पथकाद्वारे शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची तपासणी व पडताळणी करण्यात आली होती. यानुसार स्वयंमूल्यांकनात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांपैकी २०२५ व २६ या वर्षात १०७१२ शाळांची बाह्य मूल्यांकन करण्यासाठी निवड करण्यात येऊन त्यापैकी १०६४४ शाळांचे बाह्य मूल्यांकन पूर्ण करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्र शासन निर्णयातील क प्राधिकरणाची कार्यपध्दती व कार्य यामध्ये बाह्य मूल्यांकनासाठी त्रयस्थ पक्षाद्वारे मूल्यांकन पूर्ण करण्यात आले. यांच्या मूल्यांकनानंतर मिळालेल्या श्रेणीमध्ये लातूर जिल्ह्यातून प्रथम अंबिका बहुउद्देशिय महिला मंडळ, रोहिणा द्वारा संचलित लातूरच्या तुळजाभवानी प्राथमिक विद्यामंदिरला अ+ श्रेणी प्राप्त झाली आहे. तुळजाभवानी प्राथमिक विद्यामंदिराचे शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखड्याचे काम मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

### महावितरणच्या शिवजन्मोत्सव समितीच्यावतीने विविध उपक्रमांनी शिवजयंती उत्साहात साजरी

**लातूर:** महावितरणच्या शिवजन्मोत्सव समितीच्यावतीने दरवर्षीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठया उत्साहात विविध उपक्रम राबवून साजरी करण्यात आली. याप्रसंगी शिवशाहीर निशिगंधा संतोष साळुंके यांचा आम्ही जिजाऊंच्या लेकी हा शिवचरीत्र पांवाडे व स्फुर्ती गितांचा कार्यक्रम साजरा झाला. तत्पुर्वी परिमंडल कार्यालयात मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांच्या हस्ते शासकीय इतमामात शिवजयंती साजरी करण्यात आली. विद्युतभवन येथे संपन्न झालेल्या शिवजन्मोत्सवाच्या अध्यक्षपदी उपस्थित राहिलेले मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, कार्यकारी अभियंता सर्वश्री अनिरूध्द घाटगे, सुबोध डोंगरे, नागेश देशमूख, रविंद्र महाव्दार, सतिश कुलकर्णी, शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष सुनिल कापसे यांच्या प्रमूख उपस्थितीत संपन्न झालेल्या शिवजयंती उत्सवात मुख्य अभियंता अरविंद बुलबुले म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवून तमाम भारतीयांना आत्मभान दिले. गुलामीचे जीवन जगणाऱ्या मराठी माणसांच्या मना-मनात स्वराज्याचे स्वप्न धगधगत ठेवून स्वाभिमान जागवण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. सर्वगुणसंपन्न अशा या कल्याणकारी राजाचे नाव घ्यायचे असेल तर त्यांच्यासारखे गुण अंगी बाळगून दैनंदिन आचरणात आणावे असे विचारही मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी व्यक्त केले.

### व्हर्व्ह २०२५-२६ : 'स्टुडन्ट ऑफ द इयर' ट्रॉफीचे अनावरण उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद वाणिज्य महाविद्यालयात 'व्हर्व्ह २०२५-२६' अंतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या विविध स्पर्धांच्या पार्श्वभूमीवर 'स्टुडन्ट ऑफ द इयर' ट्रॉफीचे अनावरण उत्साहात पार पडले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.एम. मान्नीकर यांच्या हस्ते या ट्रॉफीचे अनावरण करण्यात आले. या अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी सहा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये पोस्टर प्रेझेंटेशन, बिझनेस क्विझ, ॲप्टिट्यूड ॲबिलिटी, टॅली टॅलेंट हंट, ॲड-ओ-मेनिया आणि बेस्ट आऊट ऑफ वेस्ट या स्पर्धांचा समावेश आहे.

## श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर महाशिवरात्री यात्रा महोत्सवानिमित्त
# २६ आणि २७ फेब्रुवारीला पशुपक्षी, अश्व-श्वान प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ फेब्रुवारी :** श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर महाशिवरात्री यात्रा महोत्सवानिमित्त यात्रा समिती, जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभाग व लातूर पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालय परिसरात २६ फेब्रुवारी २०२६ रोजी पशुपक्षी प्रदर्शन आणि २७ फेब्रुवारी २०२६ रोजी अश्व व श्वान प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. यासाठीची नोंदणी त्या-त्या दिवशी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत करण्यात येणार असून त्यानंतर निवड प्रक्रीया करण्यात येईल, असे लातूर पंचायत समितीमार्फत कळविण्यात आले आहे.



पशु प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांचे स्वास्थ दाखला प्रमाणपत्र घ्यावे. पशुप्रदर्शनातील सहभागी पशुधनांच्या कानात १२ अंकी पशु आधार नंबर असणे बंधनकारक राहील. पशुधन व श्वान, अश्व गटांची नोंदणी त्या-त्या दिवशी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंतच केली जाईल. कुठल्याही परिस्थितीत सकाळी ११ वाजल्यानंतर पशुधनाची नाव नोंदणी केली जाणार नाही. सकाळी ११ ते दुपारी ३ वा.पर्यंतची वेळ पशुधन निवडीसाठी राखीव राहील. प्रत्येक गटातील पशुधनास प्रथम, द्वितीय, तृतीय व ग्रेड नुसार अ, ब, क, ड अशा प्रकारे बक्षिस वितरीत करण्यात येईल. प्रत्येक गटात १० पशुधनाचा सहभाग बंधनकारक राहिल अन्यथा तो गट होणार नाही व त्या गटातील पशुधनास ग्रेड प्रमाणे अ, ब, क, ड या प्रमाणे बक्षिस वाटप करण्यात येईल.

सहभागी पशुपालकांना बक्षिसाची रक्कम संगणक प्रणाली आरटीजीएसद्वारे अदा करण्यात येईल. त्यासाठी नोंदणी करताना आधार कार्ड, बँक पासबुकची झेरॉक्स प्रत देणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत बक्षिसाची रक्कम रोख स्वरुपात दिली जाणार नाही. पशुपालकांनी आपले बहुमुल्य पशुधन व्यवस्थित दोरखंडाने बांधून आपल्या जबाबदारीने ठेवावे. निवड प्रक्रिया पारदर्शक असून निवड समितीचा निर्णय हा अंतिम राहील. निवड समिती अधिकारी, कर्मचारी यांच्याशी हुज्जत अथवा वाद घालणे, यासारखा अनुचित प्रकार आढळल्यास संबंधित पशुपालकाची नोंदणी रद्द करण्यात येईल. कुठल्याही परिस्थितीत सर्वोत्तम पशुधन (चॅम्पियन) निवडला जाणार नाही, असे लातूर पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी डॉ. जे. पी. वाघमारे यांनी कळविले आहे.

### प्रशु प्रदर्शनामध्ये खालील प्रमाणे गट स्थापन करण्यात येतील

देवणी नर गट- देवणीनर १ वर्षाखालील वासरे, देवणीनर १ वर्षावरील वासरे, देवणीनर २ दात वळू, देवणीनर ४ दात वळू, देवणीनर ६ दात वळू.

देवणी मादी गट- देवणी मादी १ वर्षाखालील वासरे, देवणी कालवड १ वर्षावरील, देवणी गाभण कालवड, देवणी गाभण गाय, देवणी दुधाळ गाय.

लाल कंधारी नर गट- लालकंधारी नर १ वर्षाखालील वासरे, लालकंधारी नर १ वर्षावरील वासरे, लालकंधारी नर २ दात वळू, लालकंधारी नर ४ दात वळू, लालकंधरी नर ६ दात वळू.

लाल कंधारी मादी गट- लालकंधारी मादी १ वर्षाखालील वासरे, लालकंधारी कालवड १ वर्षावरील, लालकंधरी गाभण कालवड, लालकंधारी गाभण गाय, लालकंधारी दुधाळ गाय.

संकरीत मादी गट- संकरीत मादी १ वर्षाखालील वासरे, संकरीत कालवड १ वर्षावरील, संकरीत गाभण गाय, संकरीत दुधाळ गाय.

म्हैस गट- नर, मादी, अश्व गट नर अदात, २ दातावरील. अश्व मादी गट- अदात, २ दातावरील. श्वान गट- प्रजातनिहाय कुक्कुट गट- देशी कोंबडी विदेशी कोंबडी उस्मानाबादी शेळी गट- तीन पिल्ले व त्यावरील पिल्लांची उस्मानाबादी शेळी.

### शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ फेब्रुवारी :** रॉयल एज्युकेशन सोसायटी संचलित शारदा सेमी इंग्लिश स्कूल येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थाध्यक्ष डॉ.एम.आर. पाटील सर व उपाध्यक्ष श्री एल.एम. पाटील सर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शाळेचे प्राचार्य श्री एल. टी. पुरी सर यांच्या नियोजनाखाली संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या कार्यावर आधारित प्रभावी भाषणे, पोवाडे व पाळणा गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली.या कार्यक्रमासाठी शाळेचे प्राचार्य श्री लक्ष्मण पुरी सर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांमुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती शौर्य आणि स्वाभिमानाची भावना जागृत झाली. कार्यक्रमास माध्यमिक,प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागाच्या समन्वयीका मानसी पाटील, अश्विनी पवारव वर्षा कांबळे, श्री.रोहित जाधव व मीनाक्षी सूर्यवंशी, तसेच सर्व शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी शिवरायांच्या आदर्शांचे पालन करण्याचा संकल्प केला. अशा प्रकारे शिवजयंती उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

### दयानंद विधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय निवासी शिबिराचा शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ फेब्रुवारी :** दयानंद विधी महाविद्यालय यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय निवासी शिबिराचा शुभारंभ मौजे भोईसमूद्रा येथे उत्साहात करण्यात आला.

''शाश्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकास'' या ब्रिदवाक्याखाली २५ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या या शिबिरात विविध सामाजिक, कायदेविषयक व प्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

उद्घाटन प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते हणमंत गायकवाड व तंटामुक्ती अध्यक्ष रावसाहेब गायकवाड प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांसह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तसेच महाविद्यालयातील प्रा. शितल घुटे व प्रा. अतिश तिवारी यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सात दिवसीय शिबिरातील उपक्रमांची रूपरेषा सादर करण्यात आली.

महाविद्यालयाच्या प्राचार्या तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा. पुनम नाथानी आणि प्रा. उमेश काटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी स्वयंसेवकांनी सामाजिक बांधिलकी जपत शिबिर यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

शिबिरातील प्रमुख उपक्रम : अग्निशमन व आणीबाणी सेवा मार्गदर्शन, पर्यावरण संरक्षण, मानवी हक्क जनजागृती, मोफत आरोग्य तपासणी शिबीर, डिजिटल साक्षरता अभियान, करिअर मार्गदर्शन, समाज प्रबोधनपर कीर्तन, मतदान जनजागृती, वृक्षारोपण तसेच पशुवैद्यकीय शिबीर यांसारखे विविध उपक्रम सात दिवसांत राबविण्यात येणार आहेत. या शिबिराच्या माध्यमातून गावकऱ्यांना शैक्षणिक, सामाजिक व आरोग्यविषयक मार्गदर्शन मिळणार असून ग्रामस्थांनी या उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले.

## अभ्यासपूर्वक गुंतवणूक केल्यास फायदेशीर : डॉ. रूपा गिल्डा

### दयानंद वाणिज्य महाविद्यालयात शेअर बाजार गुंतवणुकीवर कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ फेब्रुवारी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील बँकिंग अँड इन्शुरन्स समितीच्या वतीने स्टॉक मार्केट बेसिक्स टू लाईव्ह ट्रेडिंग : अ हँड्स-ऑन वर्कशॉप या विषयावर बुधवारी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने होते.

साधन व्यक्ती म्हणून डॉ. रूपा गिल्डा यांनी विद्यार्थ्यांना शेअर बाजारातील गुंतवणुकीविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी बँकिंग अँड इन्शुरन्स समितीचे समन्वयक डॉ. निखिल व्यास यांची प्रमुख उपस्थिती होती. ही कार्यशाळा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.



आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. गिल्डा यांनी सांगितले की, अभ्यासपूर्वक आणि संयमाने गुंतवणूक केल्यास शेअर बाजार अत्यंत फायदेशीर ठरू शकतो. शेअर बाजारात गुंतवणूक करण्यापूर्वी संबंधित क्षेत्राचे संपूर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडींचा विविध कंपन्यांवर होणारा परिणाम समजून घेणे गरजेचे असून, कंपन्यांचे ताळेबंद आणि आर्थिक अहवाल तंत्रशुद्ध पद्धतीने अभ्यासणे महत्त्वाचे आहे, असे त्यांनी नमूद केले. तसेच प्रत्यक्ष व्यवहार (लाईव्ह ट्रेडिंग) करताना जोखीम व्यवस्थापनाचे महत्त्वही त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले. कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध शंका उपस्थित केल्या. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना शेअर बाजारातील मूलभूत संकल्पना आणि प्रत्यक्ष व्यवहाराचे ज्ञान मिळाले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी समन्वयक डॉ. निखिल व्यास, डॉ. लता जाधव, प्रा. ऐश्वर्या कुलकर्णी तसेच प्रशासकीय कर्मचारी राजकुमार माने यांनी परिश्रम घेतले.

# शिवजयंती निमित्त शिऊरकरांना दिले 'जीवन'

### ➤ गावाला दिली विंधन विहिर भेट ➤ शिवप्रतिष्ठानच्या तरुणांचा स्तुत्य उपक्रम
### ➤ संगमेश्वर शिक्षण मंडळ व युवा उद्योजकाने केले अन्नदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ फेब्रुवारी :** शिवजयंती म्हटले की जल्लोष, डीजेचा आवाज, मिरवणूका, मोटारसायकल रॅली पण निलंगा तालुक्यातील शिऊर गावात शिऊर गावात एक आगळा वेगळा स्तुत्य सामाजिक उपक्रम राबवविण्यात आला आहे. पाणी प्रश्र्न लातूर जिल्ह्यात सातत्याने गंभीर असतो. पाणी हे जीवन आहे.. याचे सामाजिक भान ठेवून शिवप्रतिष्ठानने शिवजयंती निमित्त शिऊर गावात विंधन विहीर घेऊन ती गावाकऱ्यांना गिफ्ट केली. विशेष म्हणजे या विंधन विहिरीला चक्क ४ इंच इतके पाणी लागले आहे. त्यामुळे शिऊरकरांना ' जीवन' मिळाले आहे. उन्हाळ्यातल्या पाणी टंचाईवर त्यांना आता मात करता येणार आहे.

यावेळी संगमेश्र्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे आशिष शिवराज आष्टुरे आणि युवा उद्योजक गोपाळ पाटील यांनी गावकऱ्यांना अन्नदान करून छत्रपती शिवरायांचा जयघोष करीत शिवजयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला. विंधन विहिरीतून येणाऱ्या पाण्याच्या फवाऱ्यामुळे गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर मोठा आनंद ओसंडून वाहत होता. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.



निलंगा तालुक्यातील शेवटचे टोक म्हणजे शिऊर गाव. येथील शिवप्रतिष्ठान नव-तरुण मंडळाने' यंदा एक वेगळाच आदर्श समाजासमोर ठेवला आहे. मिरवणुकीवर होणारा लाखो रुपयांचा खर्च टाळून मंडळाने गावात पिण्याच्या पाण्यासाठी विंधन विहीर खोदून गावाची तहान भागवण्याचा संकल्प पूर्ण केला आहे.

शिवजयंतीच्या या अनोख्या उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे. शिवप्रतिष्ठानच्या तरुणांनी कुठलाही बडेजाव टाळून समाजहिताला प्राधान्य दिले आणि सामाजिक बांधिलकी जोपासली.- दरवर्षी मंडळाच्या वतीने मिरवणुकीवर मोठा खर्च केला जायचा. मात्र, यंदा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत 'डीजे'च्या तालावर नाचण्यापेक्षा ग्रामस्थांची तहान भागवायचा निर्णय घेतला. शिवजयंती उत्सवाचा निधी गोळा करून गावात एका मोक्याच्या ठिकाणी विंधन विहीर खोदण्यात आली. या विंधन विहीरीचे भूमिपूजन भारतीय सैन्य दलातील सेवानिवृत्त ले.कर्नल सचिन रंडाळे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. शोर्य चक्र व सेना पदक मिळा-लेले ले. कर्नल सचिन रांडळे आणि कीर्ती चक्र पदक विजेते सुभेदार संतोष राळे यांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर दोन्हीही लष्कर अधिकाऱ्यांनी शिऊरच्या तरुणाचे सदर उपक्रमाबद्दल कौतुक केले.



सुभेदार संतोष राळे यांनी सैन्यातील आपले अनुभव कथन करून त्यांनी व त्यांच्या टीमने १८ अतिरेक्यांचा कसा खात्मा केला ते विशद केले. त्यांचे प्रेरणादायी असे भाषण झाले. केवळ एक दिवसाचा उत्सव न करता गाव-ाला कायमस्वरूपी पाण्याची सोय करून दिली. ध्वनी आणि वायू प्रदूषणाला पूर्णपणे फाटा दिला. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे हित जपले, तोच वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न या गावचा तरुण वर्ग करत आहे.